७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. २१ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# विरोधकांनी ७० कोटी महिलांचा विश्वासघात केला

## काँग्रेस, तृणमूल, द्रमुक, सपा ते ठाकरे आणि शरद पवारांचा पक्ष महिलांविरोधी, CM देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल

**मुंबई (दै. संध्या)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्यावरून विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. विरोधकांनी संसदेत महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून देशातील 70 कोटी महिलांचा विश्वासघात केला. त्यांनी या विधेयकाची भ्रूणहत्या केली. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे ही हत्या केल्यानंतर आनंदोत्सव साजरा करून त्यांनी भारतातील समाजसुधारकांच्या विचारांवर एकप्रकारे तांडवच केले, असे ते म्हणाले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, 17 एप्रिल हा दिवस देशाच्या राजकीय व सामाजिक वाटचालीतील एक महत्त्वाचा ठरेल अशी अपेक्षा होती. एक निर्णायक क्षण ठरेल असे वाटले होते. कारण, त्या दिवशी महिला आरक्षणाचे विधेयक हे मंजूर होणार होते. सर्व लोक त्याला मदत करतील असा विश्वासही होता. पण दुर्दैवाने काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, ठाकरे गट, शरद पवार गट, समाजवादी पार्टी आदी विरोधी पक्षांनी आपल्या महिलाविरोधी मानसिकतेचे प्रदर्शन करत या विधेयकाला आवश्यक ते दोन तृतीयांश मते मिळू दिली नाही. 70 कोटी महिलांचा विश्वासघात करत या विधेयकाची भ्रृणहत्या विरोधकांनी केली. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे अशा प्रकारची हत्या केल्यानंतर जो आनंदोत्सव त्यांनी साजरा केला, तो एक प्रकारे भारतातील समाजसुधारकांच्या विचारांवर केलेले तांडव होते.

**महात्मा फुलेंच्या विचारांना तिलांजली**

मुख्यमंत्री म्हणाले, मला अतिशय दुःख आहे की, महात्मा जोतिबा फुले यांची 200 वी जन्मशताब्दी सुरू असताना विरोधकांनी त्यांच्या विचारांना तिलांजली देण्याचे काम केले. त्यात भाषणापुरते महात्मा फुलेंचे नाव घेणारे हे पक्ष पूर्णतः उघडे पडले. सभागृहात 3 विधेयके मांडण्यात आली होती. 134 वे घटनादुरुस्ती विधेयक, परिसीमन विधेयक व केंद्रशासित प्रदेश विधेयक यांचा त्यात समावेश होता. आपल्याला कल्पना असेल की, 1976 मध्ये देशात डीलिमिटेशन झाले, तेव्हा घटनादुरुस्ती करून आपण निर्णय घेतला की, 1971 ची लोकसंख्या फ्रिज ठेवून 2000 सालापर्यंत डीलिमिटेशन होणार नाही. यासंदर्भात 2002 साली डीलिमिटेशन कमिशन अस्तित्वात आले, तेव्हा महाराष्ट्रासह दक्षिणेतील राज्यांवर अन्याय होऊ नये यासाठी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्याला पुन्हा 20 वर्षांची वाढ दिली. त्यानंतर 2002 मध्ये 1971 च्याच लोकसंख्येवर आधारित राज्यांत डीलिमिटेशन करण्यात आले. त्यामुळे देशाच्या एकूण जागांमध्ये कोणताही बदल झाला नाही. परंतु 2023 साली महिला आरक्षणासाठी घटनादुरुस्ती झाली, त्यावेळी जनगणना व डीलिमिटेशन या दोन्ही गोष्टी पूर्ण करून हे विधेयक लागू करण्यात येईल अशी घटनादुरुस्ती झाली. याचा अर्थ परवा जी विधेयके आली, ती काही अचानक आली नाही. 2023 च्या घटनादुरुस्तीनुसार ती आली.

तेव्हा असे वाटत होते की, जनगणना पूर्ण होईल. पण कोविडमुळे जनगणना 2027 मध्ये पूर्ण होईल. मागचा अनुभव पाहता 2002 मध्ये सुरू झालेली डीलिमिटेशनची प्रक्रिया 2008 मध्ये संपली. त्यामुळे 2027 मध्ये डीलिमिटेशनची प्रक्रिया सुरू झाली असती, तर महिला आरक्षण 2029 मध्ये लागू झाले नसते. त्यामुळे सरकारने 2023 च्या निर्णयाला अनुरूप यावेळी डीमिलिटेशन करण्यासाठी सरकारने विधेयक मांडले होते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# अखेर निदा खान TCS मधून निलंबित

## कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका

**नाशिक (दै. संध्या)**

नाशिक लैंगिक शोषण प्रकरणातील एक संशयित असणाऱ्या निदा खानवर टीसीएसने अखेर निलंबनाची कठोर कारवाई केली आहे. कंपनीने गत 9 एप्रिल रोजीच तिच्यावर ही कारवाई केली. पण आज ही बाब समोर आली आहे. दरम्यान, आजच निदा खानच्या अटकपूर्व जामिनावर न्यायालयात सुनावणी होणार आहे.

TCS ने गत 9 एप्रिल रोजी जारी केलेल्या एका अधिकृत पत्राद्वारे निदा खानला निलंबित केले आहे.

कंपनीने म्हटले आहे की, निदा खानशी संबंधित एक गंभीर प्रकरण समोर आले आहे. त्या सध्या न्यायालयीन किंवा पोलिस कोठडीत आहेत. या परिस्थितीमुळे त्या आपल्या व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडण्यास असमर्थ आहेत. याच आधारावर त्यांना तत्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे.

निलंबन आदेशात हे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, निदा खान या 27 डिसेंबर 2021 पासून कंपनीशी संलग्न होत्या.

त्या 'प्रोसेस असोसिएट' या पदावर कार्यरत होत्या. कंपनीने त्यांचा नेटवर्क ॲक्सेसही तात्काळ प्रभावाने रद्द केला आहे. याव्यतिरिक्त, सध्या त्यांच्या ताब्यात असलेल्या कंपनीच्या सर्व मालमत्ता परत करण्याच्या सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना कोणत्याही कार्यालयात उपस्थित राहण्यास अथवा घरून काम करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

कंपनीने आपल्या आदेशात असेही नमूद केले आहे की, निदा खान हिने या प्रकरणी कोणत्याही कर्मचाऱ्याशी चर्चा करू नये. यासंबंधी संपूर्ण गोपनीयता पाळावी. त्यांनी या निर्देशांचे पालन करण्यात कसूर केली, तर त्यांच्याविरोधात शिस्तभंगाची कारवाई देखील केली जाऊ शकते. हा आदेश कंपनीचे 'एचआर हेड' (HR Head) शेखर कांबळे यांनी जारी केला आहे. त्यांच्याकडे पुणे, नाशिक आणि गोवा या विभागांची जबाबदारी आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


**ढिंग-टांग**

बातमी अशी नाही की अक्षयतृतियावर सामुहिक विवाह झाले. तर बातमी अशी असायला हवी की या कडक उन्हात नळाला एवढे पाणी आले की सामुहिक स्नान झाले.



# राळेगावच्या बेपत्ता 34 मुलींचे गूढ कायम; कुरेशी दाम्पत्याचा घटनेशी संबंध नाही

**यवतमाळ (दै. संध्या)**

यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव येथील 34 आदिवासी मुली बेपत्ता झाल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. हिंदुत्वादी संघटनांनी आज राळेगाव बंदची हाक दिली आहे. यामुळे वातावरण तंग झाले असताना जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी या प्रकरणातील संशयित कुरेशी दाम्पत्याचा या घटनांशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. विशेषतः या प्रकरणी अद्याप धर्मांतर व शोषणाची तक्रार प्राप्त झाली नसल्याचेही त्यांनी ठणकावून सांगितले आहे.

पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले, गायब झालेल्या मुलींविषयी कुरेश दाम्पत्याचा अद्याप कोणताही सहभाग आढळला नाही. तसेच शोषणाची तक्रारही दाखल झाली नाही. पण बालविवाहाच्या प्रकरणात 5 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात मजहर कुरेशी नामक व्यक्तीविरोधात घरात तलवार आढळल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**कुरेशी दाम्पत्याचे केवळ लग्न जुळवण्याचे काम**



पोलिस अधीक्षक या प्रकरणाची अधिक माहिती देताना म्हणाले, राळेगावात एक बालविवाह होणार होता. त्यात मुलगी 15 वर्षांची, तर मुलगा 44 वर्षांचा होता. हे सर्व आदिवासी समाजाचे होते. या प्रकरणाची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करत गुन्हा दाखल केला. हे प्रकरण पूर्णतः वेगळे होते. पण नंतर त्याची सरमिसळ झाली. राळेगावातील कल्याणी कुरेशी व तिचा पती मजहर कुरेशी नामक दाम्पत्य राहते. हे नवरा-बायको लग्न जुळवण्याचे काम करतात. त्यांनी आदिवासी मुलींचे लग्न लावून दिल्याच्या प्रकरणात अजून काही आढळले नाही. पण त्यांनी इतर समाजाच्या मुलींची लग्ने जुळवली आहेत. या दाम्पत्याच्या मध्यस्थीने चंद्रपूर, नागपूर, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर येथील मुलींचे लग्ने झाली आहेत. पण हे प्रकरण वेगळे आहे.

# काही प्रतिस्पर्ध्यांना मुद्दाम मैदानात उतरवले गेले

**मुंबई (दै. संध्या)**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीने राज्यासह देशाचं लक्ष वेधून घेतलं असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि खासदार पार्थ पवार यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. त्यांच्या मते, ही निवडणूक बिनविरोध होऊ शकली असती, मात्र काही राजकीय हालचालींमुळे तसे घडले नाही. काही लोकांनी जाणीवपूर्वक उमेदवार उभे करून ही निवडणूक स्पर्धात्मक बनवली, असा आरोप त्यांनी केला. या वक्तव्यामुळे बारामतीतील राजकारण पुन्हा तापले असून विविध स्तरांवर चर्चा रंगू लागली आहे.

पार्थ पवार यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, बारामतीत अनेकांची इच्छा होती की पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी. मात्र, प्रत्यक्षात तसे झाले नाही. काही उमेदवारांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि त्यांच्या मागे वेगवेगळ्या मागण्या असल्याचेही त्यांनी सूचित केले. काही प्रतिस्पर्ध्यांना मुद्दाम मैदानात उतरवले गेले, असा त्यांचा आरोप आहे. या विधानामुळे राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. दरम्यान, या निवडणुकीतून माघार घेण्याचा कोणताही प्रश्न नसल्याचे पार्थ पवार यांनी स्पष्ट केले. आम्ही निवडणुकीला पूर्ण ताकदीने सामोरे जाणार आहोत, असे सांगत त्यांनी विजयाबाबत आत्मविश्वास व्यक्त केला. मतदारांना मतदानासाठी बाहेर काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करावे लागणार असल्याचेही त्यांनी मान्य केले. सध्याच्या तीव्र उन्हामुळे प्रचार आणि मतदान प्रक्रिया अधिक आव्हानात्मक ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या सांगता सभेबाबतही पार्थ पवार यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सभेची तयारी जोरात सुरू असून स्थळाची पाहणीही करण्यात येत आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि नागरिक या सभेसाठी उपस्थित राहणार आहेत. या सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उदय सामंत, रामदास आठवले, सुप्रिया सुळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पार्थ पवार यांनी पुढे सांगितले की, सध्या बारामतीत उन्हाचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. त्यामुळे मतदारांना घराबाहेर काढणे हे मोठे आव्हान ठरणार आहे. तरीही कार्यकर्त्यांच्या मदतीने हे आव्हान पेलले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उन्हातही लोकांना मतदानासाठी बाहेर काढणे हा मोठा टास्क आहे, पण आम्ही त्यासाठी तयारी केली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.



**विजय नव्हे तर मोठा विक्रम करण्याचे आमचे लक्ष्य**

विजयाबाबत बोलताना पार्थ पवार यांनी मोठा दावा केला. त्यांनी सांगितले की, आम्ही निश्चितपणे चांगल्या मतांनी विजयी होऊ. मात्र, केवळ विजय नव्हे तर मोठा विक्रम करण्याचे आमचे लक्ष्य आहे. यापूर्वीचा 2,70,000 मतांचा विक्रम मोडण्याचा आमचा प्रयत्न असेल, असे ते म्हणाले. त्यांच्या या विधानामुळे बारामतीतील निवडणूक अधिकच रंगतदार झाली असून निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


**ब्रेकिंग न्यूज**


## मद्यावर अल्कोहोलच्या प्रमाणानुसार कर

कर्नाटक (दै. संध्या) : सरकारने राज्यातील मद्य विक्री आणि कर रचनेत मोठे बदल करण्याचे संकेत दिले आहेत. सरकारने 'अल्कोहोल बाय वॉल्यूम' म्हणजेच मद्यातील अल्कोहोलच्या प्रमाणावर आधारित नवीन कर प्रणाली लागू करण्यासाठी एक अधिकृत मसुदा प्रसिद्ध केला आहे. या निर्णयामुळे कमी अल्कोहोल असलेल्या मद्याच्या किमती कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सध्या कर्नाटकात मद्यावर त्याच्या किमतीनुसार कर आकारला जातो. मात्र, नवीन प्रस्तावानुसार, ज्या मद्यामध्ये अल्कोहोलचे प्रमाण जितके जास्त असेल, त्यावर तितका जास्त कर आकारला जाईल. कमी अल्कोहोल (उदा. बिअर): बिअरसारख्या पेयांवर, ज्यामध्ये अल्कोहोलचे प्रमाण कमी असते, कर कमी लागण्याची शक्यता आहे. जास्त अल्कोहोल (उदा. व्हिस्की, रम): ज्या मद्यात अल्कोहोलचे प्रमाण जास्त आहे, अशा मद्याच्या किमतीत वाढ होऊ शकते. कर्नाटक सरकार आपल्या महसुलात वाढ करण्यासाठी आणि कर रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी हे पाऊल उचलत आहे. अल्कोहोलच्या प्रमाणावर कर लावल्यास तो अधिक शास्त्रशुद्ध आणि पारदर्शक असेल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

### कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षांचे मत

# माध्यमांनी समाजमत घडवत महिलांविषयी संवेदनशील वृत्तांकन करण्याची गरज : विजया रहाटकर

**मुंबई (दै. संध्या)**

माध्यमांनी केवळ माहिती देण्यापुरते मर्यादित न राहता समाजमत घडवण्याची जबाबदारी पार पाडावी आणि महिलांविषयीचे वृत्तांकन करताना संवेदनशीलता व कायदेशीर अचूकता राखावी, असे प्रतिपादन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी केले. राष्ट्रीय महिला आयोग आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे आयोजित ‘महिला, माध्यमे आणि तंत्रज्ञान’ या एकदिवसीय कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी माहिती व जनसंपर्क विभागाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, लेखिका डॉ.रिचा सूद, वरिष्ठ पत्रकार स्वाती गुप्ता तसेच मुंबईतील पत्रकार उपस्थित होते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी महिलांच्या संरक्षणासाठी देशात प्रभावी कायदे अस्तित्वात असल्याचे सांगताना ‘घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा’ हा महिलांसाठी संरक्षणात्मक असल्याचे सांगितले. तसेच भारतीय राज्यघटनेने दिलेले अधिकार, नव्याने लागू झालेल्या भारतीय न्याय संहितेमधील तरतुदी, तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा, ‘पॉश’ आणि ‘पॉक्सो’ कायद्यांचे महत्त्व त्यांनी सांगितले. महिलांच्या सन्मानाला धक्का पोहोचवणाऱ्या ‘इनडिसेंट रिप्रेजेंटेशन ऑफ वूमन’ कायद्याचे वारंवार उल्लंघन होत असल्याबद्दल विजया रहाटकर यांनी खंत व्यक्त करून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी माध्यमांनी ठाम भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. माध्यमांची ताकद मोठी असून सकारात्मक बातम्यांद्वारे समाजात चांगला बदल घडवता येतो, असे सांगत त्यांनी ‘पॉझिटिव्ह स्टोरीज’ला अधिक वाव देण्याचे महत्त्वही सांगितले. महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध हेल्पलाईन्स (181, 112, 14490) तसेच ‘वन स्टॉप सेंटर’सारख्या सुविधा प्रभावीपणे कार्यरत असून त्यांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विजया रहाटकर ‘ट्रिपल तलाक’ विरोधी कायदा आणि ‘मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट’सारखे कायदे महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वाचे ठरत असल्याचे सांगितले. नव्याने लागू करण्यात आलेल्या चार श्रमसंहितांमुळे कामगार महिलांना अधिक संरक्षण मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पत्रकारांनी वृत्तांकन करताना पीडितेची ओळख गोपनीय ठेवणे, तथ्यांची पडताळणी करणे, मीडिया ट्रायल टाळणे आणि न्यायप्रक्रियेचा सन्मान राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांच्या प्रश्नांकडे केवळ गुन्हेगारी दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक, आर्थिक आणि धोरणात्मक अंगानेही मांडणी करावी, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.





तळागाळातील आणि वंचित महिलांचा आवाज मुख्य प्रवाहात आणणे ही माध्यमांची जबाबदारी असल्याचे सांगून त्यांनी नियमित प्रशिक्षण आणि क्षमता विकास कार्यक्रमांची गरज व्यक्त केली. माध्यमे आणि विविध संस्थांमधील समन्वयातूनच व्यापक सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपसंचालक (वृत्त) वर्षा आंधळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मुख्यमंत्र्यांसोबत 5 महिला नेत्या, पण एकीलाही बोलण्याची संधी नाही

**मुंबई (दै. संध्या)**

काँग्रेसने महिला आरक्षणाच्या मुद्यावरून विरोधकांवर 70 कोटी महिलांचा विश्वासघात केल्याचा आरोप करणाऱ्या मुख्यमंत्र्यांवर जोरदार पलटवार केला आहे. सत्ताधारी भाजपच्या कथनी अन् करणीत फरक आहे. आज मुख्यमंत्र्यांच्या पत्रकार परिषदेला 5 महिला नेत्या हजर होत्या. पण त्यापैकी एकाही महिलेला बोलण्याची संधी देण्यात आली नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्यावरून विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला. विरोधकांनी संसदेत महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून देशातील 70 कोटी महिलांचा विश्वासघात केला. त्यांनी या विधेयकाची भ्रूणहत्या केली. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे ही हत्या केल्यानंतर आनंदोत्सव साजरा करून त्यांनी भारतातील समाजसुधारकांच्या विचारांवर एकप्रकारे तांडवच केले, असे ते म्हणाले. त्यांच्या या टीकेनंतर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्यावर उपरोक्त शब्दांत जोरदार पलटवार केला. विजय वडेट्टीवार म्हणाले, भाजपची कथनी आणि करनी. भाजपचा महिलांबाबत कळवळा किती दिखाऊ स्वरूपाचा आहे हे आजच्या पत्रकार परिषदेत दिसून आले. मंचावर



राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री, विधान परिषदेच्या महिला उपसभापती, राज्यसभेच्या महिला खासदार, भाजपच्या महिला मोर्चा अध्यक्ष उपस्थित असताना बोललं कोण? केवळ देवेंद्र फडणवीस... मंचावर बसलेल्या एकाही महिलेला बोलण्याची संधी नाही, केवळ दिखाऊ उपस्थिती.

केंद्रीय मंत्रिमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व आहे केवळ 10%, राज्याचे मंत्रिमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व आहे केवळ 10%. भारतीय जनता पक्षाची महिला सबलीकरणाची भावना खरोखर शुद्ध असेल तर तातडीने मंत्रिमंडळात फेरबदल करून महिलांना 33% आरक्षण द्यावे, असे आव्हानही वडेट्टीवार यांनी या प्रकरणी भाजपला दिले. उल्लेखनीय बाब म्हणजे विजय वडेट्टीवार यांनी रविवारी महिला आरक्षणाच्या मुद्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले भाषण आचारसंहितेचा भंग असल्याचाही आरोप केला होता. ते म्हणाले होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल देशाला उद्देशून भाषण केले.

## संपादकीय

# सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार हा शेवटचा अधिकार

पश्चिम आशियातील युद्धसंघर्षात मृत्युमुखी पडलेल्या एका भारतीय खलाशाच्या पार्थिवाची ओळख पटविण्याचा प्रश्न अलीकडे उच्च न्यायालयापर्यंत पोहोचला. दु:खाने खचलेल्या कुटुंबाला आपल्या मुलाला शेवटचा निरोप देता यावा, यासाठी न्यायालयाने त्याच्या अवशेषांची डीएनए चाचणी करण्याचे निर्देश दिले. सरकारने सुपूर्द केलेले अवशेष खरोखर त्याच व्यक्तीचे आहेत का, याची खात्री झाल्यानंतरच कुटुंब अंत्यसंस्कार करणार आहे. मात्र, येथे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो-इतकी धडपड का आवश्यक आहे? याचे उत्तर केवळ कायद्यात नाही, तर मानवी भावनांमध्ये दडलेले आहे. मृत्यूनंतरही मानवी प्रतिष्ठा जपण्याची हमी भारतीय राज्यघटना देते. ही प्रक्रिया केवळ कायदेशीर औपचारिकता नसून, कुटुंबाला मिळणाऱ्या भावनिक 'क्लोजर'चीही गरज पूर्ण करते. त्यात माणुसकीचा शेवटचा स्पर्श दडलेला असतो. समुद्रावर नोकरी करणारा तरुण अनेक स्वप्ने उराशी बाळगून परदेशात जातो. घरच्यांसाठी तो अभिमानाचा विषय असतो. पण अचानक एक दिवस फोन येतो - तो परत येणार आहे, पण जिवंत नाही. या एका वाक्याने संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त होते. तरीही, अशा अवस्थेत कुटुंबाची सर्वात साधी आणि मानवी अपेक्षा असते - 'आम्हाला त्याला शेवटचा निरोप द्यायचा आहे.' परंतु जेव्हा पार्थिव अवशेष ओळखू न येण्यासारख्या अवस्थेत असतात किंवा परदेशात अडकून पडतात, तेव्हा हा प्रश्न केवळ भावनिक राहत नाही - तो 'घटनात्मक हक्क, आंतरराष्ट्रीय कर्तव्य आणि प्रशासकीय जबाबदारी' बनतो.

परदेशात, विशेषत: समुद्रावर किंवा युद्धजन्य परिस्थितीत मृत्यू झाल्यास पार्थिव परत आणणे ही एक जटिल आणि बहुस्तरीय प्रक्रिया असते.

परराष्ट्र मंत्रालय : समन्वय आणि राजनैतिक साहाय्य

भारतीय दूतावास : स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क आणि आवश्यक कागदपत्रे

नियोक्ता / कंपनी : खर्च आणि व्यवस्थापन

राज्य प्रशासन : पार्थिव स्वीकारणे, ओळख पटविणे आणि कुटुंबाकडे सुपुर्द करणे

कायद्याच्या भाषेतला 'अवशेष' हा शब्द कुटुंबासाठी तो शब्द नसतो, तर तो त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदू असतो. आईला मुलाचा शेवटचा स्पर्श करता येत नाही, वडिलांना खांदा देता येत नाही, बहिणीला राखी बांधलेला हात पुन्हा दिसत नाही. जेव्हा पार्थिव ओळखू येत नाही, तेव्हा 'डीएनए चाचणी' ही केवळ वैज्ञानिक प्रक्रिया राहत नाही तर ती 'ती/तो आमचाच आहे,' हे सांगणारी शेवटची खात्री ठरते. त्या क्षणी न्यायालयाचा आदेश कुटुंबासाठी दिलासा देणारा भावनिक आधार असतो.

घटनात्मक पाया: भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २१ - 'जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क' याचा विस्तार न्यायालयांनी व्यापक अर्थाने केला आहे. मानवी प्रतिष्ठा मृत्यूनंतरही संपत नाही, हे न्यायालयांनी स्पष्टपणे मान्य केले आहे. पार्थिवाला सन्मानाची वागणूक देणे आवश्यक आहे. योग्य ओळख पटविणे आणि अंत्यसंस्काराची संधी देणे हा मूलभूत हक्क आहे.

शेवटचा सन्मान: मृत्यूनंतरचा सन्मान हा कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब असतो. पार्थिव ताब्यात देणे ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून ती कुटुंबाचे दु:ख हलकं करणारी कृती आहे. शेवटचा निरोप हा मूलभूत हक्क आहे आणि ती मानवतेची खरी कसोटी आहे. म्हणूनच, माणसाला जिवंतपणी जसा सन्मानाचा हक्क असतो, तसाच मृत्यूनंतरही. म्हणून अंत्यसंस्कार हा शेवटचा अधिकार असतो.

सर्वोच्च न्यायालयाची आजवरची अनेक महत्त्वाची निरीक्षणे

मृत्यूनंतरही व्यक्तीला सन्मानाने अंत्यसंस्कार मिळणे हा मूलभूत हक्क आहे. राज्य सरकार 'ओळख न पटलेल्या' मृतदेहांकडे दुर्लक्ष करू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीशी, जिवंत असो वा मृत मानवीय भावनेने वागणे आवश्यक आहे. मृतदेहाचे संरक्षण, ओळख आणि सन्मान राखणे ही राज्याची जबाबदारी आहे.

## संस्कृत सुभाषित

ये यथा वर्तन्ते यास्मिन् तस्मीन् एव प्रवर्तयन्।
न अधर्म समवाप्नोति, न अश्रेयश्च विन्दति ॥

अर्थ – एखादा दुसरा आपल्याशी जसा वागेल त्याच्याशी तसेच वागा. असे करण्यात कोणताही अधर्म नाहीकिंवा अश्रेय म्हणजे वाईटपणा काही नाही.

## गुरु वचन

### मानवास हावरटपणा मारक

प्रत्येक व्यक्तीने आपल्या क्षमतांचे निरीक्षण केले पाहिजे व हावरटपणाविषयी नेहमी सावध राहिले पाहिजे. जे हावरट असतात ते आपली भूक, झोप इत्यादी सर्व गमावून बसतात. इच्छा नियमित केल्यामुळे आरोग्य सुदृढ राखण्यात मदत होते व जीवन नैसर्गिक नियमांनुसार चालते. हे नियम किंवा शिस्त म्हणजे इच्छा दाबणे नसून आपल्या क्षमतेनुसार समतोल रोखणे आहे. जास्त खाणे, झोपणे, जागरण आरोग्यासाठी हानिकारक आहे. असे केल्यामुळे शरीरातील विविध यंत्रणा बिघडतात व जीवनाचा उद्देश्यच नष्ट होतो. यामुळे मेंदू क्षीण होतो, हीनभावना निर्माण होते व आत्मविश्वास नष्ट होतो. क्रोध दूसरा नकारात्मक संवेग आहे जो चार मुळ प्रवृत्तीतून निर्माण होतो. जेव्हा एखाद्याची इच्छा पुर्ण होत नाही तेव्हा त्याचे उद्विग्न होते व त्यातून संताप निर्माण होतो म्हणून व्यक्तीने संताप कसा नियंत्रित करावा? हे जाणले पाहिजे.

सर्वप्रथम व्यक्तीने हे लक्षात घेतले पाहिजे की, कुठली इच्छा त्याच्या विकासात सहायक आहे किंवा मारक आहे. जर बुद्धीला शिस्त लावली तर या कामात मदत मिळेल. जर एखाद्या व्यक्तीने ही योग्यता आपल्यात विकसित केली तर राग आल्यानंतर तो स्वत: विषण करेल की, तो का चिडला व त्याची कुठली इच्छा पुर्ण झाली नाही. असे करुन त्यास आपल्या रागाचे कारण समजू शकेल.

## उपदेशकथा

### ईश्वरनिष्ठा


एक ईश्वरभक्त होता. तो व त्याचे कुटुंब सन्मार्गी होते परंतु त्याला बायको व मुलांची फार काळजी वाटे. आपली मुले सज्जन आहेत पण बाहेरचे जग तसे नाही. आपल्या मुलांना बदमाश लोक फसवतील या काळजीने तो ग्रासला होता.

एके दिवशी त्याची पत्नी त्याला म्हणाली, 'आपली मुलं इतकी गुणी आहेत व घरातही सर्व सुख असताना आपण नेहमी कसल्या चिंतेत असता?' त्यावर तो म्हणाला, 'आपली मुले गुणी व सज्जन आहेत पण या फसव्या जगात त्यांचा कसा निभाव लागणार, याची मला चिंता वाटते. त्यामुळे मला रात्री झोपही लागत नाही.' पत्नी म्हणाली, 'अहो, तुम्ही ईश्वराची भक्ती करता, शेवटपर्यंत तुम्ही अशी काळजी करत राहणार का?' तो म्हणाला, 'जेव्हा माझा मृत्यू जवळ आला आहे असे वाटेल तेव्हा मी देवाची प्रार्थना करेन की देवा, मी आता चाललो, तू अत्यंत दयाळू आहेस, माझी मुलं नीतिमान आहेत, तू त्यांचे दुष्टांपासून रक्षण कर.' हे ऐकून पत्नी म्हणाली, 'जी प्रार्थना तुम्ही शेवटी करणार, ती प्रार्थना आत्ताच करा, प्रपंचाचा सर्व भार त्या दयाळू ईश्वरावर सोपवून तुम्ही निर्भर राहा.'

कथा उपदेश : प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी झटा.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २५:२०:०६+ |
| २१ एप्रिल २०२६ | सूर्य:मेष |
| मंगळवार | चन्द्र:मिथुन१३:००:३४ |
| विक्रम संवत्– २०८२ | हिजरी सन् – १४४६ |
| वैशाख शके | मुस्लिम मास – जिल्काद |
| संवत्– १९४८ | तारीख – ३ |
| संवत्सर – पराभवनाम | विशेष |
| अयन– उत्तरायणारंभ | श्री आद्य शंकरचार्य जयंती |
| मास– वैशाख | भारतीय वैशाख मासारंभ |
| ऋतु– सौर वसंत | |
| शुक्ल पक्ष | |
| तिथि:पंचमी २५:२०:०६+ | |
| नक्षत्र:मृगशिर्षा | |
| २३:५८:१६ | |
| योग:शोभन १२:३०:४४ | |
| करण:बव १४:४४:५५ | गोविंद महाराज |
| करण:बालव | पुण्यतिथी – अमरावती |



## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 4 | | 9 | 8 | |
| | | | 5 | | 8 | | | 4 |
| 3 | | 4 | | | 9 | | 1 | 5 |
| 1 | | | 9 | 8 | | 4 | 7 | |
| | | 5 | 6 | | 3 | 1 | | |
| | 2 | 8 | | 7 | 4 | | | 3 |
| 8 | 9 | | 4 | | | 6 | | 1 |
| 2 | | | 7 | | 6 | | | |
| | 3 | 6 | | 9 | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १२४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 7 | 1 | 6 | 9 | 8 | 5 | 3 |
| 9 | 8 | 5 | 2 | 3 | 7 | 6 | 4 | 1 |
| 6 | 3 | 1 | 4 | 8 | 5 | 9 | 7 | 2 |
| 2 | 7 | 6 | 9 | 1 | 8 | 5 | 3 | 4 |
| 8 | 1 | 9 | 3 | 5 | 4 | 7 | 2 | 6 |
| 3 | 5 | 4 | 7 | 2 | 6 | 1 | 8 | 9 |
| 7 | 6 | 3 | 8 | 9 | 2 | 4 | 1 | 5 |
| 1 | 9 | 8 | 5 | 4 | 3 | 2 | 6 | 7 |
| 5 | 4 | 2 | 6 | 7 | 1 | 3 | 9 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०७५३ – रोम्युलसने रोम शहराच्या उभारणीस सुरुवात केली.
- १७९२ – ब्राझिलच्या स्वातंत्र्यसेनानी तिरादेन्तेसचा वध.
- १९१८ – पहिले महायुद्ध – जर्मनीच्या रेड बेरोन नावाने ओळखला जाणाऱ्या लढाउ वैमानिक मॅन्फ्रेड फोन रिक्टोफेनचा लढाईत अंत.

### राष्ट्रीय

- १९६८ – आंतरराष्ट्रीय लवादास विरोध करणाऱ्या १८१ सत्यग्रहींना कच्छमध्ये अटक.
- १९९७ – भारताचे पंतप्रधान म्हणून इंद्रकुमार गुजराल यांचा शपथविधी.
- २००७ – जम्मू-काश्मीर सरकारने नव्या कुलगाम जिल्ह्यात ४० बेजबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित केले.

### जन्म

- १७२९ – कॅथेरिन दुसरी, रशियाची सम्राज्ञीचा जन्म.
- १९२६ – एलिझाबेथ दुसरी, ईंग्लंडची राणीचा जन्म.
- १९३६ – जेम्स डॉब्सन, ख्रिस्ती धर्मप्रसारकाचा जन्म.
- १९७६ – शब्बीर अहमद, पाकिस्तानी क्रिकेटपटूचा जन्म.

### निधन

- ७४८ – गेन्शो, जपानी सम्राज्ञीचे निधन.
- १०१३ – पोप अलेक्झांडर दुसरा यांचे निधन.
- १५०९ – हेन्री सातवा, इंग्लंडचा राजाचे निधन.
- १९१८ – मॅन्फ्रेड फोन रिक्टोफेन, जर्मन लढाउ वैमानिकाचे निधन.
- १९३८ – अल्लामा इकबाल, भारतीय उर्दू कवीचे निधन.
- १९७१ – फ्रांस्वा डुव्हालिये, हैतीचा हुकुमशहाचा निधन.
- १९७३ – आर्थर फॅडेन, ऑस्ट्रेलियाचा तेरावा पंतप्रधान यांचे निधन.
- १९८५ – टॅंक्रेडो दि अल्मेडा नीव्हस, ब्राझिलचा राष्ट्राध्यक्ष यांचे निधन.

## : SMS :

Wife: aji, koi peeche mere pair choo rahaa hai.
Husband: peeche mud ke apna chehra dikha, woh choonaa bandh kar dega

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.५ | २७.२ |
| अहमदनगर | ३७.३ | २५.४ |
| अकोला | ४१.६ | २७.८ |
| अमरावती | ४० | २६.२ |
| बीड | ४१.४ | ३१.१ |
| भंडारा | ४३.४ | २९.९ |
| बुलढाणा | ३८.५ | २३.१ |
| चंद्रपूर | ४७.३ | ३१.४ |
| चेन्नई | ४२.८ | ३१.६ |
| नवी दिल्ली | ३८ | २५.५ |
| धुळे | ३९.९ | २६.४ |
| गोंदिया | ४२.८ | २९.९ |
| जळगाव | ४०.८ | २७.८ |
| कोल्हापूर | ३९.८ | २५.३ |
| लातूर | ३८.३ | २६.४ |
| मुंबई | ३८.१ | ३१.८ |
| नागपूर | ४१.२ | ३१ |
| नांदेड | ४०.५ | २८ |
| नंदूरबार | ३७.७ | २६ |
| नाशिक | ३७.७ | २५.१ |
| पुणे | ३६.१ | २४.९ |
| पंढरपूर | ३९.७ | २६.२ |
| सातारा | ३७.९ | २५.७ |
| सांगली | ४०.२ | २६.६ |
| सोलापूर | ४१.६ | २८.६ |
| वर्धा | ४१ | २८.२ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: पश्चिम कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील.

**तुळ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : उत्तर काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल.

**वृषभ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**वृश्चिक :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा.

**मिथुन :** शुभ रंग:गुलाबी शुभ दिशा:पश्चिम मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला.

**धनु :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पूर्व घर, वहान खरेदी करण्याचे योग आहेत. मुलांच्या भवितव्याची चिंता दूर होईल. आस्था वाढेल.

**कर्क :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा:उत्तर सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही. उद्योगधंदा चांगला चालेल.

**मकर :** शुभ रंग : पांढरा, शुभ दिशा : पूर्व बोलाचाली, व्यवहार, निर्णय हे गुप्त ठेवा. स्थावर मालमत्तेविषयी वाद विवाद होतील. नौकरीतील अडचणी दूर होतील.


**सिंह :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम वेळेचा योग्य उपयोग करून फायदा करून घ्या. घरासंबंधी समस्या निर्माण होईल.

**कुंभ :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता.

**कन्या :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम जबाबदारी वाढणार आहे. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल.

**मीन :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पश्चिम भावाकडून फायदा मिळेल. घरगुती उपयोगी वस्तू खरेदी कराल. सामाजिक कार्यात सक्रीयतेने भाग घ्याल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२५



### आडवे शब्द

२. शपथ, भाक
५. नवऱ्याची दुसरी बायको
९. गुंतागुंत
११. अरुंद मार्ग
१३. नसता उद्योग, नुकसानीचा व्यवहार याअर्थी संस्कृत वाक्प्रचार
१४. युद्धभूमी
१५. होडी
१७. मंडूक
१८. चमक
२०. भक्कम आधार देणारा, मागे उभा राहाणारा
२२. लहान
२४. ब्राह्मण
२५. झाड
२७. ध्वनी
२८. नशीब
२९. शासन
३१. थोरवी
३३. ऱ्हास
३५. दूर
३६. पृष्ठभागाचा लहानसा तुकडा
३७. कुवतीनुसार
३९. वस्त्र
४२. साडेसातीवाला ग्रह
४४. कपट
४५. जाडसर दळलेले धान्य
४७. एकाग्र नजर
४९. नंतर
५०. पावशेरच्या निम्मे
५२. आईचे वडील (संस्कृत)
५४. अत्यंत
५६. भारतात खेळण्यापेक्षा बघण्यात जास्त लोकप्रिय खेळ
५८. जिंकलेला
५९. सौम्य धोरण
६१. चारचाकी गाडी
६३. दोस्त
६४. वेंधळा
६७. सासरा
६९. घट्ट
७०. पोळीचा गुजराथी कुरकुरीत प्रकार
७२. नुकसानकारक
७३. वर्ष
७५. किल्ल्यात वा गढीत गुप्त चर्चा करण्याची जागा
७८. आयुष्य
८०. आटोक्यातून निसटलेले, आवरता न येणारे
८१. भांडण, वाद
८२. अरण्य
८३. वर्ष
८५. कोल्हा (संस्कृत)
८६. अस्थिर
८८. फळांची टोपली
८९. व्याधीग्रस्त
९०. एक हजार किलो
९२. पाश्चात्यांचे लोकप्रिय तंतूवाद्य
९४. घाईने, एकाएकी
९६. उडीद
९८. पडदा
१०१. निगरगट्ट
१०३. पाण्यातील सजीव
१०५. फुटक्या नशीबाचा
१०६. कवितेतील लोकप्रिय अलंकार
१०७. कंटाळा आणणारे
१०८. दलाली
१०९. डाग
११०. छोटा घोडा

### उभे शब्द

१. काळजीत पडलेला
२. मनाई, विरोध
३. जास्तीचा लोभ
४. भडोत्री खुनी
५. व्याजासह
६. चरबी
७. निष्णात
८. विरोध
९. अरण्य
१०. ज्ञाता
१२. पावलांचा आवाज होऊ न देता
१६. सजावट
१९. दया
२१. मिठाची चव
२२. सूक्ष्म तपशील
२३. ददात, उणीव
२४. दुसरा
२६. कोरडा
३०. कावळ्याचे ओरडणे
३२. चिलट
३४. सातू
३८. डौल, शान
४०. वेळ
४१. पर्वत
४२. डॉक्टरांचे रूग्णाच्या भल्यासाठी हत्यार चालविणे
४३. डिंक
४६. विष्णूचा बटुअवतार
४८. विरोध
५०. शर्त
५१. पाऱ्यापासून बनवलेले
५२. आई
५३. पायजमा वगैरे शिवताना वापरले जाणारे जाडेभरडे कापड
५५. बाण
५७. पर्यटकांत लोकप्रिय असलेला दक्षिणेचा प्रांत
५८. विमानाचा द्रुतगती प्रकार
६०. देव
६२. डोंगर ओलांडण्यास बांधलेला रस्ता
६४. घाई
६५. प्रजा
६६. भस्म
६८. पोपट
६९. राक्षस
७०. मासिक शुल्क देऊन जेवणाची जागा
७१. कबूल
७२. मनुष्य
७३. त्राता असलेला
७४. आकाश (संस्कृत)
७५. भांडण
७६. पुष्ट
७७. खूप खाणारा
७९. पहिला ऋतू
८०अ. युद्धाची खुमखुमी असणारा
८४. सामूहिक शोक
८७. सुरुवातीलाच विघ्न येणे याअर्थी वाक्प्रचार – 'प्रथमग्रासे -----'
८९. नाराजी
९१. दृष्टी
९३. लगोलग, ताबडतोब
९५. विरोध, अडथळा
९६. मांजर (संस्कृत)
९७. हलणारे
९९. तीव्र गरज
१००. पराकाष्ठा, मात
१०२. गवई
१०३. पाणी
१०४. चेहरा

### जम्बो शब्दकोडे क्र. १२४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कणव ३.पट ५.आदरपूर्वक १०.माल ११.चर्वित-चर्वण १२.सार १३.थापाड्या १५.कनक १७.खीर १९.ग्रह २०.राळ २१.पुलाव २२.भरपूर २४.समस्त २६.कावा २७.म या २८.सदन २९.उपरती ३२.परवश ३३.मोह ३४.धरा ३५.जलद ३७.जहर ४०.म ता ४१.रवी ४२.सौभाग्य ४३.जाणीवपूर्वक ४५.शिव ४७.पारो ४८.नट ४९.डर ५१.दैव ५२.नवरा ५४.वश ५५.हिरा ५६.सहाण ५७.लिंबू ५९.लंबकर्ण ६१.अवजड ६३.अगडबंब ६५.जू ६६.झक ६८.धनवान ७०.उपवन ७२.काक ७३.महान ७५.विटप ७६.उदंड ७७.उदर ७८.कमालीचा ७९.राजमाता ८१.कलप ८२.रथ ८३.रान ८४.परीक्षा

उभे उत्तर : १.कलकलाट २.वचक ३.पतकर ४.टच ५.आणखी ६.रसा ७.पूरग्रस्त ८.कथा ९.घड्याळ १४.पारावार १६.नव १८.रसद २२.भयावह २३.पूल २५.मनधरणी २६.कापड २७.मार २८.सहज ३०.तीव्रता ३१.अजब ३२.पदरव ३६.कुंभार ३८.हजारो ३९.शेपूट ४०.माकडहाड ४४.वनराज ४५.शिवलिंग ४६.अवलंबन ४७.पाश ५०.रण ५३.राब ५४.वर्ण ५५.हिवताप ५८.बूड ६०.कवन ६२.डझन ६३.अग्र ६४.बंधन ६७.बोकड ६९.वारेमाप ७०.उपरा ७१.वर्धमान ७२.कादंबरी ७३.मदत ७४.हार ७५.विचार ७८.कल ८०.जरा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### उन्हामुळे पुण्यात फळांची मागणी वाढली; कलिंगड, लिंबाचे दर तेजीत

पुणे (दैनिक संध्या) : उन्हाचा चटका वाढल्याने नागरिकांची पावले फ्रुटस्टॉल, सरबत विक्रेते तसेच रसवंतिगृहांकडे वळू लागली आहेत. परिणामी, बाजारात कलिंगड, खरबूज, डाळिंब या रसाळ फळांसह लिंबांना मागणी वाढली आहे. त्यातुलनेत कमी प्रमाणात माल बाजारात येत असल्याने कलिंगड आणि खरबुजाच्या भावात किलोमागे दोन ते तीन रुपये, तर डाळिंबाच्या भावात दहा टक्क्यांनी वाढ झाली आहे. उन्हाच्या झळा तीव्र झाल्याने अंगाची लाहीलाही होऊ लागली आहे. त्यामुळे उन्हाळ्यात घशाची कोरड सुकविण्यासाठी पुणेकर सरबत, उसाच्या रसाचा आधार घेत आहेत. त्याअनुषंगाने पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत लिंबांना मागणी होऊ लागली आहे. त्यातुलनेत आवक कमी होत असल्याने लिंबाच्या 15 किलोच्या गोणीमागे दीडशे ते दोनशे रुपयांनी वाढ झाली आहे. मृगबहरातील संत्रीचा हंगाम अंतिम टप्प्यात आल्याने अहिल्यानगर येथून होणारी आवक घटली आहे. आवक-जावक कायम असल्याने संत्रीसह उर्वरित सर्व फळांचे दर टिकून गत आठवड्याच्या तुलनेत टिकून असल्याचे सांगण्यात आले. फळबाजारात रविवारी (दि. 19) मोसंबीची 30 ते 35 टन, संत्रा 1 ते 2 टन, डाळिंब 25 ते 30 टन, पपई 8 ते 10 टेम्पो, लिंबाची सुमारे 600 ते 1000 गोणी, कलिंगड 15 ते 20 गाड्या, खरबूज 10 ते 15 टेम्पो, चिकू 2 हजार गोणी, पेरू 100 ते 125 क्रेट, अननस 6 ट्रक, कोकण हापूस आंबा सात ते आठ हजार पेटी आणि कर्नाटक आंब्याची अकरा हजार पेट्या आणि बॉक्स इतकी आवक झाली. फळांचे भाव पुढीलप्रमाणे : लिंबे (प्रतिगोणी) : 500-2300, मोसंबी : (3 डझन) : 170-320, (4 डझन) : 60-140, संत्रा : (10 किलो) : 400-1500, डाळिंब (प्रतिकिलोस) : भगवा : 50-280, आरक्ता : 10-60, गणेश : 10-35, कलिंगड : 10-15, खरबूज : 15-20, पपई : 8-25, चिकू (दहा किलो) : 100-600, पेरू (20 किलो) : 400-600, अननस (1 डझन) : 100-600, द्राक्षे : (15 किलो) : 700-1200, हापूस (4 ते 7 डझन) कच्चा 2000-4500, कर्नाटक : हापूस (3 ते 5 डझन) 1000-1600, पायरी (4 डझन) 700-1000.




### परांजपे स्कीम्सच्या ‘अथश्री’ला 25 वर्षे पूर्ण

पुणे (दैनिक संध्या) : नवे निवासी प्रकल्प साकारण्यात अग्रणी असलेल्या परांजपे स्कीम्स (कन्स्ट्रक्शन) प्रा. लि. या नामांकित विकसकाच्या ‘अथश्री’ या ज्येष्ठ नागरिक निवास उपक्रमाला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. भारतातील संघटित ज्येष्ठ नागरिक निवास क्षेत्राच्या घडणीत ‘अथश्री’ने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दूरदृष्टीतून सुरू झालेला हा उपक्रम आज सन्मान, स्वावलंबन आणि समुदायाधारित जीवनमूल्यांवर आधारलेली सक्षम व्यवस्था बनली आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याचे औचित्य साधत, वडोदरा येथे ‘अथश्री’च्या ६,००० व्या रहिवाशाला घराचा ताबा देण्याचा सोहळा पार पडला. या कार्यक्रमात रहिवासी, व्यवस्थापन आणि भागीदार सहभागी झाले होते. आज ‘अथश्री’चे जाळे सुमारे १६ ज्येष्ठ नागरिक वसाहतींमध्ये विस्तारले असून, विविध शहरांमध्ये ३,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांना निवास व सुविधा दिल्या जात आहेत. कार्यक्रमाची सुरुवात परांजपे स्कीम्सचे अध्यक्ष श्रीकांत परांजपे यांच्या भाषणाने झाली. त्यानंतर व्यवस्थापकीय संचालक शशांक परांजपे यांनी ‘अथश्री’चा प्रवास आणि वाढती गरज याविषयी मनोगत व्यक्त केले. यानंतर ‘अथश्री’मधील रहिवाशांनी सादर केलेल्या कलाप्रस्तुतींनी या समुदायातील उत्साह आणि सक्रिय जीवनशैली अधोरेखित केली. या निमित्ताने परांजपे स्कीम्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि.चे व्यवसाय विकास संचालक अमित परांजपे यांनी आरोग्यसेवा, वेलनेस, आपत्कालीन मदत आणि समुदाय सहभाग या क्षेत्रांमध्ये नव्या भागीदारी जाहीर केल्या. या उपक्रमांतर्गत अग्रगण्य आरोग्य संस्थांशी सहकार्य करून ओपीडी, आयसीयू, लघु शस्त्रक्रिया सुविधा तसेच कार्डियाक ॲम्ब्युलन्स आणि ऑन-कॉल पॅरामेडिक सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासोबतच पडल्यास तत्काळ इशारा देणारी आणि महत्त्वाच्या आरोग्य निर्देशकांचे रिअल-टाइम निरीक्षण करणारी हेल्थ मॉनिटरिंग प्रणाली सुरू केली जाणार आहे, ज्याची माहिती डॉक्टर आणि कुटुंबीयांना उपलब्ध राहील. वेलनेस उपक्रमांतर्गत योग संस्था आणि तज्ज्ञ प्रशिक्षकांच्या मदतीने नियमित योग व फिटनेस कार्यक्रम राबवले जातील. तसेच FUEL School, Camlin, Origami Mitra आणि कन्सिअर्ज सेवा देणाऱ्या संस्थांबरोबरच्या सहकार्याद्वारे सर्जनशील उपक्रम, शिक्षण आणि घरगुती सहाय्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. कार्यक्रमानंतर ‘अथश्री’मधील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या रहिवाशांचा विशेष सत्कार करण्यात आला.

### धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे उद्धाटन; कार्यकर्त्यांना धर्मवीर आनंद दिघे पुरस्कार

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील शिवसेना भवनामध्ये धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे तसेच पश्चिम महाराष्ट्र विभागीय कार्यालयाचे उद्घाटन उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. शिवसेना पक्षातील कार्यकर्त्यांचा सन्मान यावेळी करण्यात आले. पुणे शहर जिल्हा शिक्षक शिक्षकेतर प्रमुख अनिल गडकरी सर यांना शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल तसेच सामाजिक. अत्यावश्यक दुर्लक्षित नागरी समस्याबद्दल कसबा विधानसभा प्रमुख निलेश जगताप, ववैद्यकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल राजाभाऊ भिलारे. रक्तदान क्षेत्रात सातत्यपूर्वक काम करणारे प्रकाश ढमढेरे. उपेक्षित खेळाडूंच्या पाठीशी उभे राहून त्यांना प्रोत्साहन देणारे शंकर संगम. पक्षाच्या संपर्क क्षेत्रात कार्यामध्ये अनिल बटाने. यांना पुणे सारसबाग येथील शिवसेना भवनामध्ये महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोरे यांच्या हस्ते धर्मवीर आनंद दिघे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना निवडणूक राज्य समन्वयक व राज्य कक्ष प्रमुख धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष वैभव वाघ यांनी केले. यावेळी शिवसेना पुणे शहर प्रमुख नाना भानगिरे, पुणे शहर सहसंपर्कप्रमुख अजय बापू भोसले, शिव कामगार सेना प्रदेश अध्यक्ष सुधीर कुरुमकर, आबा बागुल, सचिन मामा थोरात,सुनील जाधव, प्रमोद प्रभुणे, विश्वास दिघे, सागर घोलप, यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.








# अक्षय्यतृतीयेला 'दगडूशेठ' बाप्पांना ११ हजार आंब्यांचा महाभोग

## शारदेश मंगलम् विवाह सोहळा संपन्न; श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट

**पुणे (दै. संध्या)**

अक्षय्यतृतीयेनिमित्त दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांचा महाभोग दाखविण्यात आला. साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त असलेल्या अक्षय्यतृतीयेच्या मंगलदिनी दरवर्षी हा महा नैवेद्य बाप्पाला दाखवला जातो. सनई व मंगलाष्टकांचे स्वर... लग्नसोहळ्यासाठी सजलेला मंडप आणि शुभमंगल सावधान च्या मंगल स्वरांत मंदिरात श्री गणेश आणि देवी शारदा यांचा विवाह सोहळा संपन्न झाला. याच दिवशी गणरायाचे दर्शन व्हावे, याकरिता भाविकांनी पहाटेपासून रांगा लावल्या होत्या.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात आंबा महोत्सव आयोजित करण्यात आला. यामध्ये गणपती बाप्पांना ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. पुण्यातील आंब्यांचे सुप्रसिद्ध व्यापारी देसाई आंबेवालेचे संचालक मंदार देसाई कुटुंबियांच्यावतीने हा नैवेद्य देण्यात आला.

गाणपत्य सांप्रदायातील परंपरेनुसार विवाह सोहळ्याचे आयोजन देखील केले जाते. दुपारी १२ वाजून ४७ मिनिटांनी भगवान श्री गणेश आणि देवी शारदा यांचा विवाह म्हणजेच शारदेश मंगलम् सोहळा थाटात पार पडला. संकेत मते यांसह तुषार रायकर यांनी सपत्नीक पूजन केले. रात्री भारतीय वारकरी महिला मंडळाच्यावतीने उटीचे भजन देखील आयोजित करण्यात आले होते.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, श्री गणेशांच्या दोन शक्तींना गाणपत्य संप्रदायात देवी सिद्धी आणि देवी बुद्धी या नावाने आळविले जाते. भगवंताच्या क्रियाशक्तीला देवी सिद्धी असे म्हणतात, तर भगवंताच्या ज्ञानशक्तीला देवी बुद्धी असे म्हणतात.

अश्विन महिन्यामध्ये शरद ऋतू असल्याने या काळात प्रगट झालेल्या देवी बुद्धीला शारदा असे म्हणतात. शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे तिची उज्ज्वलता, आल्हाददायकता असल्याने तिला शारदा असे म्हणतात. शरद ऋतू मधील प्रसन्नतेप्रमाणे देवी बुद्धीने प्रसन्नता प्राप्त होत असल्याने तिला शारदा असे म्हणतात. अशा देवी शारदेचा भगवान श्री गणेशांसोबतच्या महामीलनाचा सोहळा म्हणजे श्री शारदेश मंगलम आहे.

मंदिरात रविवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सुक्त अभिषेक झाला. त्यानंतर पहाटे ४ वाजता गायिका विदुषी मंजुषा पाटील यांनी स्वराभिषेकातून गायनसेवा अर्पण केली. सकाळी ८ वाजता गणेशयाग देखील झाला. आंब्याचा प्रसाद ससूनमधील रुग्णांना, श्रीवत्समधील मुलांना तसेच वृद्धाश्रम व दिव्यांग मुलांच्या संस्था व मंदिरात भाविकांना देण्यात येणार आहे.

# एसएनडीटी पुण्यात कर्वे पुतळा प्रलंबित

## 64 वर्षांपासून प्रतीक्षा; निवृत्त प्राध्यापकांकडून कुलगुरूंना थेट सवाल

**पुणे (दै. संध्या)**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अर्थात एसएनडीटीच्या पुण्यातील कॅम्पस परिसरात महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा पुतळा उभारण्याचे कार्य त्यांच्या मृत्यूनंतर गेली 64 वर्षे प्रलंबित आहे, याचे भान अद्याप विद्यापीठ प्रशासनास आलेले नाही. त्यामुळे संस्थेचे संस्थापक कर्वेंची उपेक्षा कधी संपणार? असा थेट प्रश्न संस्थेचे निवृत्त प्राध्यापक धनंजय कुलकर्णी यांनी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव यांना विचारला आहे.



कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यापीठाच्या पुणे परिसरातील वसतिगृह सक्षमीकरण व सुशोभीकरण या उपक्रमासाठी पूनावाला विश्वस्त संस्थेने काही देणगी दिली. या देणगीच्या कृतज्ञतेपोटी येथे श्रीमती पूनावाला यांचा पुतळा व भव्य स्मारक परिसरात केंद्रस्थानी उभारण्यात आला. परिणामी, चित्र असे निर्माण झाले, की हे विद्यापीठ श्रीमती पूनावाला यांनी उभे केले; म्हणून त्यांचे एवढे भव्य स्मारक उभे केले आहे.

तत्कालीन प्राध्यापकांनी श्रीमती पूनावाला यांचा पुतळा केंद्रस्थानी उभारण्यास विरोध केला. वसतिगृहासाठी देणगी दिली आहे, वसतिगृहात पुतळा बसवा, हा प्रस्ताव पूनावाला संस्थेने मान्य केला. तसेच, महर्षी कर्वे यांचा पुतळा संस्थेतील दर्शनी भागात बसवावा, असे ठरले. या पुतळा उभारणीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वेतनातून मदत देखील दिली. गेल्या दोन वर्षांत पूनावाला यांचा पुतळा हटविला नाही व कर्वेंचा पुतळा देखील उभारण्यात आला नाही.

कर्वेंच्या पुतळा उभारणीच्या कार्यात होणारी दिरंगाई अक्षम्य आहे. संस्थेच्या स्थापनेला 110 वर्षे झाली. परंतु, कर्वेंचे योग्य स्मारक होऊ शकले नाही. पुतळा बसविण्यासाठी शिल्पकाराने दिलेल्या सूचनांचे पालन संस्थेने केले नाही. परिणामी, पुतळा प्रत्यक्ष उभारण्यात येणाऱ्या अडचणींकडे प्रशासनाने केलेले दुर्लक्ष गंभीर आहे.



## अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पुणेकरांची वाहनखरेदीला पसंती

### दुचाकींचा सर्वाधिक वाटा, ई-वाहनांचीही वाढती मागणी

**पुणे (दै. संध्या)**

अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पुणेकरांनी वाहन खरेदीला पसंती दिली असून, यंदा या मुहूर्तावर प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे येथे 7 हजार 579 वाहनांची खरेदी केल्याची नोंद करण्यात आली आहे. यात सर्वाधिक म्हणजे 4 हजार 992 एवढ्या दुचाकी वाहनांचा समावेश आहे. तर, 1 हजार 973 चारचाकींचा समावेश आहे. याशिवाय 306 इलेक्ट्रिक पर्यावरण पूरक वाहनांचीही पुणेकरांनी खरेदी केल्याचे समोर आले आहे. अक्षय तृतीया, गुढीपाडवा आणि दसरा या सणांच्या मुहूर्तावर वाहन, सोने, घरगुती वस्तू व इलेक्ट्रॉनिक्स साहित्य खरेदी करण्याची परंपरा आहे. शुभमुहूर्त मानल्या जाणाऱ्या या दिवशी वाहन खरेदीसाठी ग्राहक मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या खरेदीकडे वळतात. यंदाही शहरातील वाहनविक्रेत्यांनी आकर्षक ऑफर्स जाहीर केल्या होत्या. अनेक पुणेकरांनी यंदा 12 ते 19 एप्रिल 2026 या आठ दिवसांच्या कालावधीत 7 हजार 579 वाहनांची खरेदी केली. आरटीओने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरून यंदा शहरात दुचाकी खरेदी सर्वाधिक झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पुणे ‘ग्लोबल सिटी’कडे; महापालिकेचा महत्त्वाकांक्षी विकास आराखडा

**पुणे (दै. संध्या)**

विद्येचे माहेरघर व आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याचा कायापालट करण्यासाठी महापालिकेने कंबर कसली आहे. आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि तंत्रज्ञान, अशा सर्वच आघाड्यांवर पुणेकरांना जागतिक दर्जाच्या सुविधा पुरविण्यासाठी एक व्यापक विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. 1 रुपयात अद्ययावत उपचार, महिलांना मालमत्ता करात 50 टक्के सवलत, स्टार्टअपसाठी मोफत इन्क्युबेशन सेंटर आणि देशातील पहिले महापालिका डेटा सेंटर, अशा अनेक प्रकल्पांमुळे पुण्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे. महापालिकेच्या या ‘सुपर व्हिजन’मुळे पुणे ‘ग्लोबल सिटी’च्या दिशेने झेपावणार आहे, असा विश्वास व्यक्त करीत महत्त्वाचे प्रकल्प सहा महिन्यांत पूर्ण करणार, असा संकल्प महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी व्यक्त केला. या सुविधा केवळ 1 रुपयात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच, बाणेर येथे पीपीपी तत्त्वावर देशातील अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालय उभारण्यात येत असून, तिथे महागड्या चाचण्या आणि उपचार केवळ 20 टक्के दरात मिळतील. भिमाले म्हणाले, महापालिका स्वतःचे ‘डेटा सेंटर’ उभारणारी देशातील पहिली महापालिका ठरणार आहे.

# २५ लक्ष मोगऱ्यासह फुलांनी सजले महालक्ष्मी मंदिर

## श्री महालक्ष्मी मंदिर सारसबागेच्या वतीने आयोजन; श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती, श्री महाकाली देवीला पुष्प पोशाख

**पुणे (दै. संध्या)**

मोगऱ्याच्या २५ लक्ष सुवासिक फुलांचा गंध अनुभवित श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती, श्री महाकाली देवीला परिधान केलेलामोगऱ्याचा पुष्पपोशाख पाहण्याकरता पुणेकरांनी मोठी गर्दी केली. सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिराच्या परिसरात मोगऱ्याच्या फुलांची सजावट अक्षय्यतृतीयेच्या निमित्ताने करण्यात आली होती. निमित्त होते, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री बन्सीलाल रामनाथ अग्रवाल धार्मिक व सांस्कृतिक ट्रस्ट च्यावतीने अक्षय्यतृतीयेच्या निमित्ताने मोगरा महोत्सवाचे. यावेळी ट्रस्टच्या प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त तृप्ती अग्रवाल यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ही सजावट करण्यात आली. मोगऱ्याच्या फुलांनी मंदिराचा परिसर खुलून गेला होता. मंदिराचा गाभारा व सभामंडपात विविधरंगी फुलांची आरास करण्यात आली.

तब्बल १०० किलो मोगरा, गुलाबाच्या फुलांच्या गड्डया, चाफा, जाई-जुई, गुलछडी, तगर, झेंडू, कार्नेशियन, ऑर्किड यांसह अनेक फुलांची आरास करण्यात आली. श्री महालक्ष्मी देवीसह श्री महासरस्वती व श्री महाकाली देवीसमोर नैवेद्य देखील दाखविण्यात आला. फुलांची आरास पाहण्याकरीता पुणेकरांनी मोठ्या संख्येने गर्दी केली. ही आरास सोमवार, दि. २० एप्रिल पर्यंत पाहण्यासाठी खुली असणार आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे...




### राजस्थानमधील रिफायनरीला भीषण आग, पंतप्रधान मोदी उद्या उद्घाटन करणार होते...

राजस्थान (दैनिक संध्या) : राजस्थानच्या पचपदरा येथील बहुप्रतिक्षित रिफायनरीमध्ये सोमवारी दुपारी अचानक भीषण आग लागली. ही घटना अशा वेळी घडली आहे जेव्हा उद्याच, २१ एप्रिल रोजी सकाळी ११:३० वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या रिफायनरीचे औपचारिक उद्घाटन होणार होते. या आगीमुळे रिफायनरीचे मोठे नुकसान झाले असून उद्याच्या कार्यक्रमावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रिफायनरीच्या एका मुख्य प्रोसेसिंग युनिटमध्ये ही आग लागली. आगीची तीव्रता इतकी भीषण होती की, धुराचे काळे लोट सुमारे एक किलोमीटर अंतरावरूनही स्पष्ट दिसत होते. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या २० हून अधिक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आग इतर युनिट्समध्ये पसरू नये यासाठी अग्निशमन दलाचे जवान युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. ही आग शॉट सर्किटमुळे लागली की यात घातपाताचा काही संबंध आहे, याचा तपास तांत्रिक टीम आणि सुरक्षा यंत्रणा करत आहेत. पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या अवघ्या २४ तास आधी ही घटना घडल्याने प्रशासन हादरले आहे. उद्घाटनाच्या ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती, तरीही ही आग लागल्याने सुरक्षा व्यवस्थेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. रिफायनरी व्यवस्थापनाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे काम सुरू असून, नुकसानीचा आढावा घेतल्यानंतरच उद्याच्या कार्यक्रमाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.



### छत्तीसगडमध्ये चार्टर्ड विमान डोंगररांगांना धडकले; विमानाचा भीषण स्फोट

जशपूर (छत्तीसगड) (दैनिक संध्या) : छत्तीसगडच्या जशपूर जिल्ह्यात सोमवारी दुपारी एका चार्टर्ड विमानाचा भीषण अपघात झाला. हे विमान आरा टेकड्यांमधील रतनपहली जंगलात झाडांना आणि डोंगराला धडकल्याने कोसळले. अपघातानंतर विमानाने पेट घेतला असून डोंगर परिसरातून धुराचे प्रचंड लोट आणि आगीच्या ज्वाळा दूरवरून दिसत आहेत. या अपघातात विमानातील वैमानिक आणि सह-वैमानिकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, हे विमान नारायणपूर क्षेत्रातील रतनपहली जंगलावरून जात असताना अचानक डोंगराच्या दिशेने झुकले आणि वेगाने डोंगररांगांना जाऊन धडकले. धडक इतकी जोरात होती की विमानाचे तुकडे झाले आणि त्याला भीषण आग लागली. डोंगराळ आणि जंगल परिसर असल्याने मदतकार्यात सुरुवातीला अनेक अडचणी येत होत्या. घटनेची माहिती मिळताच स्थानिक गावकरी आणि पोलीस प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. विमानात एकूण किती लोक होते, याची अधिकृत माहिती अद्याप प्रशासनाकडून मिळालेली नाही, मात्र वैमानिकांचा मृत्यू झाल्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. हे विमान कोणाचे होते आणि कुठून कुठे जात होते, याचा शोध पोलीस घेत आहेत. तांत्रिक बिघाड किंवा खराब हवामानामुळे हा अपघात झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. डीजीसीए कडून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले जाण्याची शक्यता आहे.



### पश्चिम बंगालमध्ये 7 लाख नवीन मतदारांची भर; निवडणुकीत राजकीय गणिते बदलणार?

कोलकाता (दैनिक संध्या) : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, आगामी मतदानापूर्वी राज्यातील मतदार यादीत सुमारे ७ लाख नवीन मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. या वाढीव मतदारसंख्येमुळे राजकीय गणिते बदलण्याची शक्यता वर्तवण्यात येत असली, तरी आयोगाने या मतदारांचे सखोल तपशील जाहीर केलेले नाहीत. सात लाख नवीन मतदारांपैकी सुमारे ३.२२ लाख मतदार पहिल्या टप्प्यात आपला मतदानाचा हक्क बजावतील. उर्वरित ३.८८ लाख मतदार दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी पात्र आहेत. या नवीन नोंदणीमुळे राज्यातील एकूण मतदारांची संख्या आता ६ कोटी ८२ लाख ५१ हजार ८ इतकी झाली आहे. बंगालमधील सत्तासंघर्ष पाहता, या सात लाख नवीन मतदारांचा कल कोणाकडे असेल, यावर सर्व राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे. विशेषतः तरुणांची आणि महिलांची संख्या किती आहे, हे स्पष्ट झाल्यानंतर प्रचाराची दिशा अधिक स्पष्ट होऊ शकते. आयोगाने एकूण आकडेवारी जाहीर केली असली, तरी यामध्ये १८ वर्षे पूर्ण झालेले प्रथमच मतदान करणारे किती आहेत, याबाबत स्पष्ट माहिती दिलेली नाही. तसेच, नवीन मतदार नोंदणी अर्ज किती प्राप्त झाले होते व त्यापैकी किती अर्ज फेटाळण्यात आले, याची माहितीही अद्याप समोर आलेली नाही.

# जम्मू-काश्मीरमध्ये बस दरीत कोसळली

## २१ ठार, २९ हून अधिक प्रवासी जखमी; भरधाव बसचे टायर फुटल्याने १०० फूट खोल दरीत कोसळली



**जम्मू (दै. संध्या) :**

जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात आज (दि. २०) सकाळी भीषण बस अपघात झाला. रामनगरहून येणारी बस कगोत जवळ रस्त्यावरून सुमारे १०० फूट खाली कोसळून उलटली. या अपघातात २१ जणांचा मृत्यू झाला असून २९ हून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत.

जखमी प्रवाशांनी दिलेल्या माहितीनुसार, बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी होते आणि तिचा वेगही खूप जास्त होता. कगोत नाल्याजवळ अचानक बसचे टायर फुटले. यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट दरीत कोसळली. या भीषण अपघातात बसच्या वरच्या भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत माहिती दिली की, अपघातग्रस्त बस सार्वजनिक वाहतुकीची होती. सध्या जखमींवर उधमपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (GMC) उपचार सुरू आहेत.

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी'तून (PMNRF) २ लाख रुपयांची सानुग्रह मदत दिली जाईल. तसेच, जखमींना ५०,००० रुपयांची मदत दिली जाईल, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे.

**पंतप्रधानांनी व्यक्त केला तीव्र दुःख**

पंतप्रधान मोदी म्हणाले, "जम्मू आणि काश्मीरमधील उधमपूर येथे बस अपघातामुळे झालेल्या जीवितहानीची बातमी ऐकून मला अत्यंत दुःख झाले आहे. ज्यांनी या दुर्घटनेत आपले जवळचे आणि प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती मी माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करतो. जखमींनी लवकरात लवकर बरे व्हावे, यासाठी मी प्रार्थना करतो, असेही मोदी यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये दिली आहे.

## तामिळनाडूत फटाका कारखान्यात भीषण स्फोट

### १६ कामगारांचा मृत्यू, मृतांचा आकडा वाढण्याची भीती



**विरुधुनगर (दै. संध्या) :**

तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यात एका फटाका निर्मिती कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. प्राथमिक माहितीनुसार, या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचे मृतदेह ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले असून, अनेक कामगार अद्यापही मलब्याखाली गाडले गेल्याची भीती व्यक्त होत आहे. या घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हा भीषण स्फोट कट्टनारपट्टी भागातील एका फटाका युनिटमध्ये झाला. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की, आगीने काही वेळातच शेजारील चार युनिट्सना आपल्या कचाट्यात घेतले. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्फोटाच्या धक्क्याने परिसरातील इमारतींचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि आपत्ती निवारण पथके घटनास्थळी दाखल झाली असून, युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. सध्या संपूर्ण परिसराला पोलिसांनी वेढा घातला असून सुरक्षेच्या कारणास्तव कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, फटाके तयार करताना सुरक्षा मानकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही दुर्घटना घडली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. प्रशासनाने या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. स्थानिक प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून बचावकार्य वेगाने सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी व्यक्त केला शोक**

या हृदयद्रावक घटनेवर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, "विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनापट्टी येथील फटाका कारखान्यात झालेल्या स्फोटात अनेकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत वेदनादायी आहे. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती मी संवेदना व्यक्त करतो."

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, त्यांनी मंत्री के. के. एस. एस. आर. रामचंद्रन आणि थंगम थेन्नारासू यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून बचावकार्यावर देखरेख करण्याचे तसेच बाधित कुटुंबांना धीर देण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून पीडितांना सर्वतोपरी मदत सुनिश्चित करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



## हातात पिस्तूल अन् वेगात दुचाकी.., 'ते' रील ठरलं शेवटचं!

**मध्य प्रदेश (दै. संध्या) :**

सोशल मीडियासाठी 'रील' बनवण्याचे वेड तरुणांच्या जीवावर बेतल्याची धक्कादायक घटना मध्य प्रदेशातील मौगंज जिल्ह्यात घडली आहे. नॅशनल हायवेवर वेगाने दुचाकी चालवत आणि हातात बंदूक नाचवत रील बनवण्याच्या नादात तीन सख्ख्या भावांना आपला प्राण गमवावा लागला आहे.

उभ्या असलेल्या ट्रकला दुचाकीने पाठीमागून जोरदार धडक दिल्याने हा भीषण अपघात झाला. या घटनेत अन्य दोन तरुण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पन्नी पथरिया परिसरात हा अपघात झाला.


बेला गावातील उपलक्ष कोल (१७), अमरीश कोल (२२) आणि हेमराज कोल (१७) हे तीन भाऊ एका पल्सर दुचाकीवरून जात होते. यावेळी त्यांचा दुसरा एक मित्र दुसऱ्या दुचाकीवरून त्यांच्या मागे येत रील शूट करत होता.

अतिवेगात असलेल्या पल्सरवरील तरुणांपैकी एकाच्या हातात कट्टा (देशी बनावटीचे पिस्तूल) असल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. समोरून येणाऱ्या ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात असताना, रस्त्याच्या कडेला विटांनी भरलेला एक ट्रेलर उभा होता. दुचाकीचा वेग इतका प्रचंड होता की नियंत्रण सुटले आणि दुचाकी थेट ट्रेलरला जाऊन धडकली. यामध्ये तिन्ही भावांचा जागीच मृत्यू झाला.

## डेंग्यूवर पहिली भारतीय लस तयार; वाढत्या रुग्णसंख्येवर येणार नियंत्रण

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतात दरवर्षी पावसाळ्यात डेंग्यूचे संकट अक्राळविक्राळ रूप धारण करते. डेंग्यूचा वाढता धोका लक्षात घेता आरोग्य क्षेत्रातून एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारताने डेंग्यूवरील पहिल्या लसीला म्हणजेच अर्थात टवशपसर (क्युडेन्गा) ला अधिकृत मंजुरी दिली आहे. औषध महानियंत्रकांच्या तज्ज्ञ समितीने 4 ते 60 वयोगटातील लोकांसाठी ही लस सुरक्षित असल्याचे मानले आहे. जपानच्या टाकेडा फार्मास्युटिकल्स कंपनीने विकसित केलेली ही लस अत्यंत प्रभावी मानली जात आहे. या लसीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, एखाद्या व्यक्तीला पूर्वी डेंग्यू होऊन गेला आहे किंवा नाही, याची कोणतीही तपासणी न करता ही लस देता येते. डेंग्यूच्या चारही प्रकारच्या विषाणूंपासून संरक्षण देण्याची क्षमता क्युडेन्गा लसीमध्ये




आहे. क्लिनिकल ट्रायल्समध्ये असे दिसून आले आहे की, ही लस चार वर्षांहून अधिक काळ संरक्षण देऊ शकते. सरकारी आकडेवारीनुसार, 2020 मध्ये 44 हजार असलेले डेंग्यूचे रुग्ण 2023 व 2024 या दोन वर्षात 2.3 लाखांच्या पार गेले आहेत.

# "सुप्रीम कोर्टात तुमची एंट्रीच बंद करू..."

## सुभाषचंद्र बोस यांना 'राष्ट्रपुत्र' घोषित करण्याची मागणी करणाऱ्या वकिलावर ओढले कडक शब्दांमध्ये ताशेरे

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे क्रांतिकारी नेते नेताजी सुभाषचंद्र बोस यांना 'राष्ट्रपुत्र' घोषित करण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या याचिकेत नेताजींच्या 'आझाद हिंद फौज' या संघटनेला भारताच्या स्वातंत्र्याचे अधिकृत श्रेय देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली होती. ही याचिका दाखल करणाऱ्या वकिलाला सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी चांगलेच धारेवर धरत "सर्वोच्च न्यायालयात तुमचा प्रवेशच बंद करू," असा इशाराही दिला.



**याचिकाकर्त्यांनी कोणत्या मागण्या केल्या होत्या?**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांना अधिकृतरीत्या 'राष्ट्रपुत्र' घोषित करण्यात यावे आणि आझाद हिंद फौजेमुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले, हे अधिकृतरीत्या स्वीकारण्यात यावे, अशा दोन प्रमुख मागण्या वकील व याचिकाकर्ते पी. मोहंती यांनी आपल्या याचिकेत केल्या होत्या.

**तुम्ही न्यायालयाचा वेळ वाया घालवत आहात? :सरन्यायाधीश**

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी याचिकाकर्ते पी. मोहंती यांना सुनावले की, "तुम्ही न्यायालयाचा वेळ वाया घालवत आहात. तुम्ही नेहमीच अशी कामे केली आहेत. यापूर्वीही तुमच्याकडून अशाच प्रकारच्या याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. जर तुमच्या वर्तनात सुधारणा झाली नाही, तर आम्ही सर्वोच्च न्यायालयात तुमच्या प्रवेशावरच बंदी घालू."

**सरन्यायाधीशांनी दिला जुन्या याचिकांचा संदर्भ**

जेव्हा सरन्यायाधीशांनी जुन्या याचिकांचा संदर्भ दिला, तेव्हा याचिकाकर्त्याने "ही याचिका वेगळी आहे," असे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावर खंडपीठाने "या याचिकेचा मसुदा (Draft) कोणी तयार केला?" अशी विचारणा केली. मोहंती यांनी 'मुखर्जी सर' यांनी ही याचिका तयार केल्याचे सांगताच न्यायालयाने त्यावरही तीव्र आक्षेप नोंदवला.

**भविष्यात कोणतीही जनहित याचिका स्वीकारू नका :**

न्यायालयने स्पष्ट केले की, ही याचिका केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी दाखल करण्यात आली आहे. "अशा याचिका आधीही फेटाळण्यात आल्या आहेत," असे सांगत खंडपीठाने सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्री विभागाला महत्त्वाचे आदेश दिले. भविष्यात या याचिकाकर्त्याची कोणतीही जनहित याचिका (PIL) नोंदवून घेऊ नका, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...




## "एआय सोबतची कार्यप्रणाली " विषयावर परिसंवादास प्रतिसाद

पिंपरी (दैनिक संध्या) : एच आर इन्फोटेक असोसिएशन पुणे चॅप्टरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता( ए आय) सोबत काम करताना असणारी संधी/ आव्हाने " या विषयावर आयोजित केलेल्या चर्चासत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी अल्ट्रा कॉर्पोटेकचे मुख्य मनुष्यबळ विकास संसाधन अधिकारी डॉ. राहुल बागले, बीएनवायच्या मनुष्यबळ विकास संसाधन विभागाचे इंडिया हेड अमोल गुप्ता, नीलसॉफ्टचे मुख्य मनुष्यबळ विकास संसाधन अधिकारी प्रिया दामले,हर्बिंजर ग्रुप टॅलेंट विभागाचे उपाध्यक्ष नेव्हील पोस्टवाला,,सक्षम भारत संस्थेचे सह संस्थापक तथा एच आर इन्फोटेक असोसिएशनचे कार्यकारी सदस्य बळीराम मुतगेकर या तज्ञ मंडळींनी मार्गदर्शन केले. यावेळी किशोर भालेराव, शाम लाल, विजय कानबुर,प्रविण सावंत, मनीषा तपस्वी, सुधीर दप्तरदार,मिलिंद मुतालिक,रोहित काटकर मयूर चंद्रात्रे, अक्षय सरोदे, योगेश नेने, डॉ. नेत्रा नीलम,उत्तम सपकाळ, सुमेध कदम हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. फ्युचर ऑफ वर्क : नेव्हीगेटिंग एआय, ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स अँड ग्लोबल शिफ्ट्स " या विषयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वर्षा राऊत, करण राजपाल, अभिजीत पुरी, अश्विन जयसिंघानी, सचिन ढवळे, मयूर अत्रे, निरंजन काळे, नेहा वर्मा, अभिनेश अस्वर, तहसीन शेख, रिचल डिसुझा या एचआर सभासदांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचा उद्देश कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय ) विकसित होत असलेले ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स आणि बदलत्या जागतिक परिस्थितीमुळे कार्यक्षेत्रात होत असलेल्या बदलांवर सखोल चर्चा घडवून आणणे हा होता. या पॅनलमध्ये नामांकित कंपन्यातील मनुष्यबळ विकास संसाधन क्षेत्रातील नेते सहभागी झाले होते. या चर्चा सत्रात एआय आधारित मनुष्यबळ विकास संसाधन क्षेत्रात परिवर्तन, जागतिक कार्यक्षमता केंद्राची वृद्धी आणि बदल, कर्मचारी अपेक्षांमधील बदल तसेच जागतिक अनिश्चिततेत नेतृत्वाची भूमिका, एआय आधारित "डिजिटल एम्पलॉईज", कामगार गुणवत्ता सुधार व्यवस्थापण या महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन केले. यावेळी एच आर इन्फोटेक असोसिएशनचे कार्यकारी सदस्य बळीराम मुतगेकर म्हणाले कि," मनुष्यबळ विकास संसाधन क्षेत्रातील कार्य पद्धतीत वेगाने बदल होत आहेत. या व्यासपीठाच्या माध्यमातून एचआर नेत्यांना अनुभवांची देवाण-घेवाण करण्याची आणि भविष्यातील कार्यसंस्कृती घडवण्याची संधी मिळेणार आहे. या कार्यक्रमासाठी पोलस्टार आणि हायर एक्स यांचे विशेष सहकार्य लाभले. एचआर इन्फोटेक असोसिएशन ही संस्था गेली ३० वर्षांपासून आयटी /आयटीईएस क्षेत्रातील एच आर व्यवसायिकांसाठी कार्य करीत आहे.एक सक्षम नेटवर्क निर्माण करणे, ज्ञान प्रसार करणे, उद्योग वाढवण्यासाठी सहकार्य सातत्याने कार्यरत आहे.



## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

पिंपरी (दैनिक संध्या) : बाराव्या शतकातील थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वर महाराज यांनी नागरिकांना स्त्री-पुरुष समानतेबरोबरच एकात्मता, बंधुता, अहिंसा तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश दिला,प्रत्येक माणसाला जीवन जगण्याची समान संधी मिळावी त्यात कोणताही भेदभाव करण्यात येऊ नये याकरिता सतत कार्यरत असणारे महात्मा बसवेश्वर यांच्या व्यापक विचारसरणीचा वारसा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्यील महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अभिवादन कार्यक्रमास कर्नाटकातील बसवकल्याण विधानसभा मतदारसंघाचे आमदार शरणू सलगर यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेचे पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निगडी येथील महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास आमदार शरणू सलगर, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे,माजी उपमहापौर तथा नगरसदस्या शैलजा मोरे,नगरसदस्य अमित गावडे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, मोरेश्वर भोंडवे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये हेल्मेटकडे दुर्लक्ष जीवघेणे

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवडमध्ये हेल्मेटकडे दुर्लक्ष थेट जिवावर बेतत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. मागील वर्षभरात शहरात झालेल्या 373 अपघातांपैकी तब्बल 209 अपघातांमध्ये दुचाकीस्वारांनी हेल्मेट घातले नसल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे. या निष्काळजीपणामुळे डोक्याला गंभीर दुखापत होऊन मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे. शहरात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यात वेगाने गाडी चालवणे, सिग्नल न पाळणे आणि नियमांकडे दुर्लक्ष करणे यामुळे अपघात वाढत आहेत. दुचाकी चालवताना हेल्मेट न घालणे धोकादायक ठरत आहे. अपघात झाल्यावर शरीराच्या इतर भागापेक्षा डोक्याला बसणारा मार जीवघेणा ठरत असल्याचे डॉक्टरही सांगतात. दरम्यान, अपघात टाळण्यासाठी रस्त्यांवर घातले जाणारे स्पीड ब्रेकर (गतिरोधक) काही ठिकाणी उलट अपघातांचे कारण ठरत आहेत. शहरातील अनेक रस्त्यांवर चुकीच्या पद्धतीने तयार केलेले उंचवटे दिसतात. हे उंचवटे अचानक आल्याने दुचाकीस्वारांचे संतुलन बिघडते आणि अपघात होतात. नागरिकांकडून महापालिकेवर याबाबत दुर्लक्ष केल्याचा आरोप केला जात आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ओला कचरा स्वतः जिरवा

## महापालिकेचा इशारा; 100 किलोपेक्षा जास्त कचरा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील दररोज 100 किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या, रुग्णालये, हॉटेल्स, शैक्षणिक संस्था, मंगल कार्यालये, कॅण्टीन, वसतिगृह, कंपन्या आणि मोठ्या आस्थापनांना महापालिका आरोग्य विभागाने पुन्हा एकदा ओला कचरा स्वतःच्या परिसरातच जिरविण्याचा इशारा दिला आहे. एक एप्रिलपासून घनकचरा व्यवस्थापन नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी सुरू झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

केंद्र शासनाच्या 27 जानेवारी 2026 च्या अधिसूचनेनुसार, प्रतिदिन 100 किलोपेक्षा जास्त ओला कचरा निर्माण होणाऱ्या किंवा मोठ्या क्षेत्रफळ, पाण्याचा अधिक पाणी वापर असलेल्या आस्थापनांनी कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. नियमांचे पालन न केल्यास पहिल्यांदा 5 हजार रुपये, तर दुसऱ्यांदा 15 हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याला जाणार आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार, शहरातील 233 हाऊसिंग सोसायट्यांनी स्वतःच ओला कचरा जिरविण्याची व्यवस्था उभी केली आहे.

तयार होणारे खत त्यांच्या बागा आणि हरित पट्ट्यांसाठी वापरले जाते. मात्र, अजूनही 877 सोसायट्यांमधून महापालिकाच ओला कचरा उचलत आहे. सोसायट्यांमधून दररोज 288 टन कचरा निर्माण होत असल्याने, त्याचा ताण महापालिकेच्या यंत्रणेवर पडत आहे. वारंवार नोटीसा देऊनही कंपोस्ट खत प्लांट सुरू न केल्याने गेल्या वर्षभरात 101 हाऊसिंग सोसायट्यांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यात केवळ 35 हजार रुपये दंडाची वसुली झाली. यापूर्वीही नोटिसा, मुदतवाढ आणि काही ठिकाणी नळजोड तोडण्याच्या कारवाया करण्यात आल्या होत्या.




### सहा वर्षांपासून रखडली अंमलबजावणी

केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार सन 2019 पासून महापालिकेकडून या घनकचरा व्यवस्थापन नियमावलीची अंमलबजावणी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वी आरोग्य विभागाने सोसायट्यांना नोटिसाही बजावल्या होत्या. वेळोवेळी मुदत दिली. परंतु, हाऊसिंग सोसायट्या व राजकीय दबावातून कारवाईबाबत प्रशासनाने माघार घेतली. मागील वेळेत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हस्तक्षेप करत ती सक्ती काही काळ रोखली होती. आता प्रशासनाने पुन्हा सोसायट्यांना इशारा दिला आहे.

### कंपोस्ट खत प्रकल्प न उभारल्यास दंडात्मक कारवाई

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने 27 जानेवारी 2026 रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे या नियमात बसणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या व आस्थापनांना ओला कचरा जिरविणे बंधनकारक आहे. त्यांनी तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले.

### शहरातील अशी आहे सद्यः स्थिती

ओला कचरा स्वतः जिरवणाऱ्या हाऊसिंग सोसायट्या : 233
महापालिका अजूनही कचरा उचलते त्या हाऊसिंग सोसायट्या : 877
वर्षभरात दिलेल्या नोटिसा : 101
वसूल दंड : 35 हजार रुपये
सोसायट्यांमधून दररोज निर्माण होणारा कचरा : 288 टन
ओल्या कचऱ्यापासून खतनिर्मिती : 10 टक्के




## पिंपरी-चिंचवडमध्ये भटक्या श्वानांचा आजार वाढतोय

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी शहरातील गांधीनगर परिसरात भटके श्वान आजारी पडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. महापालिकेकडून भटक्या श्वानांचा बंदोबस्त होत नसल्याने शहरात आजारी श्वानांची संख्या वाढत आहे. त्याचा फैलाव इतर भागांत होऊ नये यासाठी लसीकरण मोहीम महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने हाती घेतली आहे. तसेच येथील मोकाट श्वानांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

गांधीनगर, खराळवाडी गावठाण, आत्मनगर, बजरंगनगर, कामगारनगर, विठ्ठल रखुमाई मंदिर, कर्मयोग सोसायटी, युनायटेड चर्च, सुदर्शन चौक, चांदणी चौक या परिसरात काही भागांत भटके श्वान आजारी पडल्याच्या घटना दिसून आल्या आहेत. शहरात मोकाट श्वानांची वाढती संख्या नागरिकांना धोकादायक ठरत आहे. भटके श्वान आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या भटक्या श्वानांच्या आजारावर वेळीच उपचार आणि लस घेतली नाही, तर शहरातील अनेक भटके श्वान मोठ्या संख्येने आजारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

श्वानप्रेमींकडून श्वान दगावल्यास संबंधितांना वेठीस धरले जाते. मात्र, श्वानदंशने मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या घरी श्वानप्रेमी जातात का, असा संतप्त सवाल पीडित नागरिक करीत आहेत. महापालिकेने संबंधित यंत्रणांवरही श्वानप्रेमी संघटनांचा दबाव असल्याने श्वानांबाबत कारवाई करण्यावर दबाव येत असल्याचे सांगण्यात येते. मोकाट श्वान पकडलेही जात नाहीत, तसेच त्यांची नसबंदी केली जात नसल्याने श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.

## पीसीपीच्या "बहुउद्देशीय शेती रोबोट" प्रकल्पाचा प्रथम क्रमांक

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकने "प्रोटेक प्रकल्प स्पर्धा" मध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. ऑटोमेशन आणि रोबोटिक्स या विषयात यश संपादन करत पीसीपीच्या "बहुउद्देशीय शेती रोबोट" प्रकल्पास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. लवळे येथील सिम्बायोसिस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

पीसीपी मधील इ. अँड टी. सी. विभागाच्या हर्षल जाधव, साईराज सुरवसे, पुष्कर सोनवणे व वेदांत काळे या विद्यार्थ्यांनी हा प्रकल्प सादर केला होता. आताच्या काळात युवकांचे रोजगारासाठी शहरांकडे होणारे स्थलांतर यामुळे शेती साठी मजुरांची कमतरता, वाढता खर्च आणि वेळे अभावी शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्यांचा विचार करून विद्यार्थ्यांनी सादर केलेला




रोबोट विविध आधुनिक वैशिष्ट्यांनी सुसज्ज असून शेतीतील अनेक कामे स्वयंचलित पद्धतीने करू शकतो. बीज पेरणी, पिकांवर फवारणी, गवत कापणे, जमिनीतील ओलावा तपासणे, तापमान संवेदक, सौर ऊर्जा, नांगरणी, मोबाइल ॲपद्वारे नियंत्रण, आर्द्रता, आवाजाद्वारे नियंत्रण यांसारखी कामे अचूक आणि जलद गतीने करतो. यामध्ये सेन्सर व स्वयंचलित नियंत्रण प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.

या रोबोट मुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. मानवी श्रम कमी होणे, वेळेची बचत, कमी खर्चात शेती करणे तसेच पिकांची निगा अधिक चांगल्या प्रकारे राखणे शक्य होईल. त्यामुळे उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होऊन शेती अधिक आधुनिक व सुलभ बनू शकते. पीसीपी चे प्राचार्य डॉ. विद्या ब्याकॉड यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजेत्या संघाचे आणि मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

## पिंपरी आगारात पाणीटंचाई; स्वच्छतागृह सहा महिन्यांपासून बंद

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) आगारातील वर्कशॉपमध्ये गेल्या सहा महिन्यांपासून पाणीटंचाईची गंभीर समस्या असून, स्वच्छतागृह बंद ठेवण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची मोठी गैरसोय होत आहेत. मूलभूत सुविधांच्या अभावामुळे कामकाजावर परिणाम होत असून, प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार कर्मचारी वर्गातून केली जात आहे.

वल्लभनगर परिसरातील या आगारामध्ये सध्या 50 एस. टी. बस आहेत. दररोज 31 बस फेऱ्या आगारातून सुटतात आणि तेवढ्याच बस परत येतात. याशिवाय दिवसभरात विविध आगारांमधील सुमारे 550 बस येथे ये-जा करतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक आणि देखभाल कार्य सुरू असताना वर्कशॉपमध्ये आवश्यक पाणीपुरवठा नसल्याने येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना ऐन उन्हाळ्यात मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वर्कशॉपमध्ये दररोज बसेसची तपासणी आणि दुरुस्तीची कामे केली जातात.

ही कामे वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक असते. तपासणी, दुरुस्तीनंतरच बस प्रवाशांच्या सेवेसाठी मार्गस्थ होतात. मात्र, स्वच्छतागृह बंद असल्याने कर्मचाऱ्यांना सुमारे 200 ते 300 मीटर अंतर चालत जाऊन चालक-वाहकांसाठी असलेल्या विश्रांतीगृहातील स्वच्छतागृहांचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे कामात खंड पडतो आणि वेळेचा अपव्यय होत असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार वारंवार तक्रारी करूनही आगार प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. कर्मचारी संघटनांनी या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली आहे. पाणीपुरवठा सुरळीत करून वर्कशॉपमधील स्वच्छतागृह तातडीने सुरू करण्यात यावीत, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, या समस्येमुळे केवळ कर्मचाऱ्यांनाच नव्हे तर अप्रत्यक्षपणे प्रवाशांच्या सेवेलाही फटका बसू शकतो. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने हस्तक्षेप करून परिस्थिती सुधारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## पिंपरी भाजी मंडईत दर स्थिर; पालेभाज्यांचे भाव वाढले

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी येथील लालबहादूर शास्त्री भाजी मंडईत रविवारी (दि. 19) बाजारात गेल्या आठवड्याप्रमाणे फळभाज्यांचे दर स्थिर होते. उन्हामुळे पालेभाज्यांचे दर वाढले आहेत. उन्हाळ्यामुळे कोथिंबीरची जुडी 30 रुपये दराने विक्री केली जात होती. गवार आणि शेवगा आता 50 - 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. वांगी, फ्लॉवर 30 - 40 रुपये किलो दराने होते.


मिरची 60 रुपये, कर्नाटक कैरी बाजारात 50 - 60 रुपये किलो दराने विक्री केली जात आहे. कांदे 100 रुपयांना 5 किलो विक्री केली जात आहे. लसूण 100 - 150 रुपये, तर आले 60 - 80 रुपये किलो दराने उपलब्ध होते. रविवारी बाजारात गवार 50 रुपये किलो, शेवगा 40, टोमॅटो 25, भेंडी 50, फ्लॉवर 20, कोबी 15, मिरची 50, गाजर 25, शिमला 50, लसूण 100 - 120 रुपये, आले 50.

# पिंपरी-चिंचवडमध्ये आरएमसी प्लांटचा कहर

## सिमेंटच्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका; श्वसनाचे आजार वाढले, कडक कारवाईची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोकळा जागा, शेतजमिनी, जुनी बैठी घरे व इमारती तोडून टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. त्यासाठी शहरात भर लोकवस्तीत रेडिमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांट उभे राहत आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना सिमेंटच्या धुळीचा तसेच, अवजड वाहनांचा मोठा त्रास होत आहे. परिसरातील हवेत प्रदूषण वाढत आहे. परिणामी, नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात राहण्यास मोठी पसंती दिली जात आहे. त्यामुळे मोकळी जागा दिसेल, तेथे उंचच उंच इमारती उभ्या केल्या जात आहेत. औद्योगिक कंपन्या व उद्योग बंद करून तेथे गृहप्रकल्प निर्माण होत आहे. जुनी बैठी घरे, चाळी व जुन्या इमारती पाडून नवनवे गृहप्रकल्प तयार केले जात आहेत. त्या बांधकामासाठी आरएसमी प्लांट भर लोकवस्तीजवळ उभे केले जात आहेत. तेथून बांधकाम प्रकल्पापर्यंत तयार काँक्रीट पुरवठा केला जातो. मात्र, काँक्रीट तयार करताना वाळू, खडी, सिमेंट व पाणी मिक्स केले जाते. त्यामुळे प्लांटमधून मोठ्या प्रमाणात सिमेंट मिश्रित धूळ हवेत परसरत असून परिसरातील हवेत प्रदूषण वाढत आहे.

सतत अजवड वाहनांची ये-जा होत असल्याने पक्के रस्ते खराब होतात. वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडते. प्लांट व वाहनांच्या वर्दळीमुळे आजूबाजूच्या रहिवाशांसह वाहनचालकांना श्वसनाचे त्रास होत आहेत. त्याबाबत रहिवाशांकडून प्रदूषण मंडळ व महापालिका प्रशासनाकडे मोठ्या संख्येने तक्रारी करण्यात आल्या आहेत. आंदोलनेही झाली आहेत. काही तक्रारींची दखल घेऊन महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून कारवाई केली आहे. मात्र, काही दिवसांनंतर ते प्लांट पुन्हा सुरू होतात. पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण होत असल्याने हिरवळीचे तसेच, उद्यानाचे शहर म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडची प्रदूषण पातळी धोकादायक पातळीवर जाऊन पोहचली आहे. त्याबाबत ठोस उपाययोजना करण्याचे मत शहरवासीयांकडून व्यक्त केले जात आहे.

आरएमसी प्लांटमधून निघणारी सिमेंटची सूक्ष्म धूळ फुफ्फुसासाठी अत्यंत घातक आहे. यामुळे दमा, त्वचेचे व श्वसनाचे आजार वाढत आहेत. विशेषत वृद्ध व बालकांना त्याचा अधिक त्रास होत आहे. ती धूळ थेट घरात पसरते. त्यामुळे घरात धूळीचा थर साचत आहे. तसेच, रस्त्यावर व झाडांवर धुळीचे थर निर्माण होत आहेत. परिणामी, प्लांटच्या आजूबाजूला राहत असलेल्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पुणे महापालिकेतील नगरसेवकांनी शहरातील आरएमसी प्लांट शहराबाहेर हलवण्यासाठी आणि अवैध प्रकल्प बंद करण्यासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्याप्रमाणे पिंपरी-चिंचवड शहरातील आरएमसी प्लांट लोकवस्तीपासून दूर उभारण्याची मागणी होणे आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवडमधील हवेच्या प्रदूषणात आरएमसी प्लांटचा मोठा वाटा असूनही, येथील लोकप्रतिनिधी ठोस भूमिका घेत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. वेळीत हे प्लांट नागरी वस्तीपासून लांब हलवले नाहीत, तर पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांचे आरोग्य आणखी खालावण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार, आरएमसी प्लांटभोवती उंच पत्रे लावणे, पाण्याचा फवारा मारणे आणि धूळ रोखण्यासाठी यंत्रणा बसवणे बंधनकारक आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमधील बहुतांश प्लांटमध्ये या नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. दै. पुढारीने यापूर्वीही याबाबत अनेकदा वृत्त प्रसिद्ध करीत त्याबाबत आवाज उठवला आहे. मध्यंतरी पिंपरी-चिंचवड राज्यातील सर्वात प्रदूषित शहर ठरले होते.

## थोडक्यात पण महत्त्वाचे...



### माशेलकर स्वरूप केंद्राच्या वतीने निवासी शिबिराचे आयोजन

जुन्नर (दैनिक संध्या) : सुट्टीमध्ये मुलांना कशाप्रकारे गुंतवून ठेवावे हा प्रश्न पालकांना नेहमी सतावत असतो, यासाठी जुन्नर तालुक्यातील माशेलकर स्वरूप स्पेस व इनोवेशन सेंटरच्या वतीने विद्यार्थ्यांचे कुतूहल जागृत ठेवून त्यांना विश्वापर्यंतची सर्व माहिती देण्यासाठी दोन दिवसाच्या निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती या केंद्राचे सचिव डॉ. रतिलाल बाबेल व उपाध्यक्ष डॉ. तानाजी वामन यांनी दिली. दिनांक 16 मे व 17 मे 2026 या दोन दिवसात निवासी शिबिराचे आयोजन केले आहे. पहिल्या दिवशी अंतराळ विज्ञानाची ओळख, अंतराळ विषयक माहितीपट, वायुगतिकी मूलतत्वे, अंतराळ मोहिमा, स्टेम (STEM) शिक्षण प्रणालीवर आधारित प्रत्यक्ष कृती उपक्रम, विश्वरचना, दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षणाची संधी, पृथ्वीबाहेरील मानवी जीवनाचे भविष्य या विषयावर वादविवाद व चर्चासत्र तर दुसऱ्या दिवशी कृत्रिम बुद्धिमत्ता व रोबोटिक्स प्रत्यक्ष प्रशिक्षण माशेलकर स्वरूप स्पेस अँड इनोवेशन सेंटरचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. प्रतिक मुणगेकर, उपाध्यक्ष डॉ. कल्पेश जाधव हे घेणार आहेत. तसेच दुसऱ्या दिवशी रॉकेट निर्मिती कार्यशाळा, मंगळ व चंद्र वसाहत सिम्युलेशन, अंतराळ प्रश्नमंजुषा या बाबी होणार आहेत. त्या विषयातील तज्ञ मार्गदर्शक दोन दिवस सहभागी विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थ्यांना कृतीद्वारे शिक्षणाचा अनुभव मिळणार आहे. एखादी संकल्पना पाठ न करता ती कृतीद्वारे केल्यामुळे अधिक समजून घेण्यासाठी हे निवासी शिबीर उपयोगी पडणार आहे. विद्यार्थ्यांना व पालकांना आपल्या मनातील शंका समाधानासाठी तज्ञांबरोबर वेळ राखून ठेवला आहे. सर्व सहभागींना आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रयोग करण्याची संधी मिळावी म्हणून मर्यादित जागा ठेवल्या असल्यामुळे ज्यांना सहभागी होण्याची इच्छा आहे त्यांनी एप्रिल महिन्यापर्यंत डॉ. रतिलाल बाबेल (9860389956) व डॉ. तानाजी वामन ( 8830894453 ) यांच्याशी संपर्क करावा.



### चाकणला दिलीप मोहिते यांनी घेतले आमदार बाबाजी काळे यांच्यावर तोंडसुख

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यात विकास कामांचा बट्ट्याबोळ झाला असून, तालुक्याला विकासाकडे नेणाऱ्या एका दमदार आणि कष्टाळू नेतृत्वाची गरज आहे. इतरांनी केलेल्या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न होत असल्यामुळेच तालुका विकास कामांपासून कोसो दूर चालला आहे, अशा शब्दात खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी आमदार बाबाजी काळे यांच्यावर सडकून टीका करत चांगलेच तोंडसुख घेतले.वाडा, पाईट व महाळुंगे इंगळे जिल्हा परिषद गटातील विकास कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मोहिते यांनी आमदार बाबाजी काळे यांच्यावर तोंडसुख घेतले. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद बुट्टे पाटील, लोकनेते अशोकराव खांडेभराड, जिल्हा परिषदेचे सदस्य गणेश बोत्रे, समीर सुपे आदी उपस्थित होते.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून खेड तालुक्यासाठी मोठा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यातील अनेक कामे पूर्ण झाली. तर काही कामे पूर्णत्वाकडे आहेत. त्याचा गाजावाजा आम्ही करत नाही. परंतु विद्यमान आमदारांकडून सोशल मीडियावरील जाहिरातींमधून हजारो कोटींच्या कामांचा गाजावाजा केला जात आहे. मात्र प्रत्यक्षात कोणतेही ठोस कामे दिसत नाही. हा केवळ दिखावा असून जनतेची प्रचंड मोठी दिशाभूल केली जात आहे. स्मार्ट स्कूल योजनेतील कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत संबंधित विभागाकडे तक्रार दिली असल्याचे मोहिते यांनी सांगितले. निष्पक्ष चौकशी न झाल्यास तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. स्मार्ट स्कुलच्या कामांचे फलक लावण्यात आले होते. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी फलक हटविण्याचे आदेश दिल्याने फलक काढण्यात आल्याची नामुष्की काळे यांच्यावर ओढवली असल्याचे मोहिते यांनी सांगितले.

### चाकण येथे 1 मे पासून तीन दिवसीय श्री भैरवनाथ महाराजांचा उत्सव


चाकण (दैनिक संध्या) : समस्त ग्रामस्थ मंडळी चाकण व श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे शुक्रवार (दि.१ मे) ते रविवार (दि.३ मे) या सलग तीन दिवसांच्या कालावधीत श्री भैरवनाथ महाराजांचा उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवानिमित्त पालखी मिरवणूक, छबिना, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल व भव्य बैलगाडा शर्यत आयोजित करण्यात आली असून, विजेत्या बैलगाडा मालकास जाहीर करण्यात आल्याप्रमाणे रोख ३ लाख, ०४ हजार, ७७६ रुपये इनाम विभागून देण्यात येणार आहे. श्री भैरवनाथ महाराजांच्या उत्सवाच्या दिवशी शुक्रवारी (दि.१ मे) पहाटे पाच वाजता श्री भैरवनाथ महाराजांचा अभिषेक व पूजा करण्यात येणार आहे. त्यानंतर आठ वाजता हारतुरे, मांडवडहाळे व भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मार्केटयार्ड चाकण यांच्या पुतळ्यापासून मिरवणुकीचा मोठ्या दिमाखात शुभारंभ होणार आहे. सायंकाळी सहा वाजता भैरवनाथ मंदिरापासून श्री भैरवनाथ महाराजांची पालखी, छबिना निघणार आहे. रात्री साडेसात वाजता चाकण नगर परिषदेसमोर प्रचंड मोठ्या आतषबाजीचा कार्यक्रम होणार आहे. शनिवारी (दि. २ मे) सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळात रोहकल रस्त्यावरील श्रीराम लक्ष्मण चौकात भव्य बैलगाडा शर्यती आयोजित करण्यात आल्या आहेत. प्रथम क्रमांकाच्या विजेत्या बैलगाडा मालकास रोख १,११,१११ रुपये, तसेच यातील फळीफोड गाड्यास रोख ११ हजार रुपये देण्यात येणार आहेत. द्वितीय क्रमांकास रोख ७७,७७७ रुपये तसेच यातील फळीफोड गाड्यास रोख ७,००० रुपये देण्यात येणार आहेत. तृतीय क्रमांकास रोख ५५,५५५ रुपये व यातील फळीफोड गाड्यास रोख ६,००० रुपये देण्यात येणार आहेत. चतुर्थ क्रमांकास रोख ३१,३३३ रुपये व यातील फळीफोड गाड्यास रोख ५,००० रुपये दिले जाणार आहेत.

# उरुळी कांचनमध्ये अल्पवयीन मुलावर अत्याचार

**‘पोक्सो’ अंतर्गत गुन्हा दाखल; ग्राफिक डिझायनरकडून अश्लील चाळ्यांचा आरोप; पीडित मुलाच्या तक्रारीनंतर पोलिसांची कारवाई**

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

‘तू मला खूप आवडतोस’ असे म्हणत एका 16 वर्षीय अल्पवयीन बालकाचा जबरदस्तीने मुका घेऊन व अश्लील चाळे केल्याचा प्रकार उरुळी कांचन (ता. हवेली) येथे नुकताच उघडकीस आला. याप्रकरणी अष्टापूर (ता. हवेली) येथील डिझायनरवर उरुळी कांचन पोलिस ठाण्यात ‘पोक्सो’ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नागराज कोतवाल (रा. अष्टापूर ता. हवेली) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका 16 वर्षाच्या मुलाने उरुळी कांचन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना शुक्रवारी (दि. 17) रात्री 10 वाजण्याच्या सुमारास कस्तुरी लॉन्ससमोर घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगा शुक्रवारी कस्तुरी लॉन्ससमोर असलेल्या आरोपी कोतवाल याच्या ‘नागराज ग्राफिक्स’



येथे कामानिमित्त गेला होता. काम संपल्यानंतर आरोपी नागराज कोतवाल याने पीडिताला घरी फोन करून सांग की काम जास्त आहे, उशीर होईल असे म्हणत हॉटेलवर थांबण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर, आरोपीने आपल्या गाडीतून पीडिताला पुणे-सोलापूर महामार्गावरील भांडगाव (ता. दौंड) येथे नेले. तेथे रस्त्याच्या कडेला गाडी उभी करून, ‘तू मला खूप आवडतोस’ असे म्हणत पीडिताचा जबरदस्तीने मुका घेतला आणि अश्लील चाळे केले. तसेच लॉजवर चालण्याबाबत विचारणा करून पीडितावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आरोपी कोतवाल याने पीडित मुलाला रात्री पाऊणेतीन वाजण्याच्या सुमारास उरुळी कांचन येथे त्याच्या नागराज ग्राफिक्स ऑफीसवर घेऊन आला.

या वेळी त्याच्या ऑफीसवर कामाला असलेल्या एका मुलासोबत फिर्यादी मुलगा घरी निघून गेला. घाबरलेल्या मुलाने घरी गेल्यानंतर घडलेला सर्व प्रकार आपल्या आईला सांगितला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि. 18) दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास नागराज याने पुन्हा फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. घाबरलेल्या अवस्थेत पीडिताने आपल्या आईसह उरुळी कांचन पोलिस स्टेशन गाठले आणि तक्रार दाखल केली.

## दौंडमध्ये वाढती गुन्हेगारी; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दौंड (दै. संध्या)**

दौंड शहर आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीने डोके वर काढले असून, हे शहर आता गुन्हेगारीचे ‘हब’ बनू लागले आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. शहरात सर्रासपणे कोयते, कुऱ्हाडी आणि काठ्यांचा वापर करून दहशत माजवली जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आता गुन्हेगारांकडे गावठी कट्टे देखील उपलब्ध झाली असून, यामुळे शहरात एखाद्या मोठ्या अनर्थाची शक्यता निर्माण झाली आहे.

मागील 15 दिवसांत गुन्हे अन्वेषण शाखेच्या पुणे येथील पथकाने एकाला पिस्तूल आणि काडतुसासह अटक केली असली, तरी शहरात अनेक भुरट्यांकडे





अद्यापही गावठी कट्टे असल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी दोन गटांतील वाद सोडवायला गेलेल्या नागरिकांवरच गुन्हे दाखल करण्याचे प्रकार घडले आहेत. दुसरीकडे, ज्यांच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत, ते सराईत गुन्हेगार मात्र राजकीय पाठबळामुळे मोकाट फिरत आहेत. पोलिसांकडून त्यांना तडीपार केले जात नसल्याने सामान्य नागरिक, व्यावसायिक आणि व्यापारीवर्गामध्ये भीतीचे वातावरण आहे.

दौंड पोलिस ठाण्याच्या दारातच काही दिवसांपूर्वी सत्तूर आणि कुऱ्हाडीने मारहाण झाल्याची घटना घडली. मात्र, या वेळी पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. रेकॉर्डवरील गुन्हेगार शहरात खुलेआम फिरत असतानाही पोलीस त्यांना पकडण्यात अपयशी ठरत आहेत. या गुन्हेगारांचे ‘मोबाईल सीडीआर’ तपासून त्यांच्याकडे असलेल्या शस्त्रास्त्रांचा साठा जप्त करण्याची मागणी होत आहे. एकूणच गुन्हेगार मस्त, पोलीस सुस्त आणि ग्रामस्थ त्रस्त अशी परिस्थिती आहे.

यवतमध्ये काही महिन्यांपूर्वी घडलेल्या भीषण घटनेची आठवण करून देत दौंडमधील नागरिक चिंता व्यक्त करीत आहेत. जर पोलिसांनी वेळीच सावध होऊन सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या नाहीत, तर दौंडमध्येही गोळीबारासारख्या घटना घडून एखादे मोठे हत्याकांड होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

शहरातील काही राजकीय पक्षांचे नेते कुरकुंभ औद्योगिक वसाहतीमधील अधिकाऱ्यांकडून विविध कार्यक्रमांच्या नावाखाली सक्तीने वर्गणी गोळा करत असल्याचे वृत्त आहे. ही एक प्रकारे ‘खंडणी’च असून, भीतीपोटी अधिकारी हे पैसे देत असल्याची चर्चा आहे.

## राजगुरुनगरच्या सिद्धेश्वर मंदिरात चोरी; दानपेट्या फोडून रक्कम लंपास

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

राजगुरुनगर शहरातील प्रसिद्ध पांडवकालीन सिद्धेश्वर मंदिरात सोमवारी (दि २०) चोरी झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील दोन दानपेट्या फोडून भाविकांच्या दान केलेल्या रकमेवर डल्ला मारला. विशेष बाब म्हणजे हे मंदिर खेड पोलिस ठाण्या समोर हाकेच्या अंतरावर आहे. राजगुरुनगर येथील भोपाळबुवा आणि सिद्धेश्वर महाराजांची यात्रा शुक्रवार पासून रविवार पर्यंत सुरळीत आणि उत्साहात पार पडली. यात्रा संपताच ही घटना घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे.

भीमा नदीच्या काठावर अत्यंत रमणीय परिसरात सिद्धेश्वर मंदिर आहे. मंदिर हे परिसरातील भाविकांचे पश्रद्धास्थान आहे. मंदिरातील पुजारी सकाळी पुजेसाठी आल्यावर चोरीचा प्रकार उघडकीस आला. घटनेची माहिती पुजाऱ्यांनी दिल्या बरोबर राजगुरुनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तातडीने कारवाई सुरू केली आहे. घटनास्थळी श्वान पथक (डॉग स्क्वाड) पाचारण करण्यात आले असून, पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेज, ठसे आणि इतर तांत्रिक पुराव्यांचा वापर करून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे. पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी सांगितले की, चोरीची रक्कम किती होती याचा अंदाज लवकरच कळेल.

## लग्नसराईचा जल्लोष; बाजारपेठेत आर्थिक उभारी

**बारामती (दै. संध्या)**

महिनाभराच्या खंडानंतर बारामती तालुक्यात पुन्हा एकदा लग्नसराईचा जोर चढला आहे. उन्हाच्या कडाक्यातही विवाह सोहळ्यांची धामधूम सुरू झाली आहे. घोड्यावर बसलेला नवरदेव, डीजे-बँडच्या तालावर थिरकणारी वरात, मंगलाष्टकांचा गजर आणि ‘शुभमंगल सावधान’च्या घोषणेसह होणारा टाळ्यांचा कडकडाट असे वातावरण तालुक्यात सर्वत्र पाहायला मिळत आहे.

21 एप्रिलपासून लग्नहंगामाला सुरुवात होत आहे. एप्रिल ते जुलैदरम्यानच्या मुख्य 28 मुहूर्तांमध्ये तालुक्यात हजारो विवाह सोहळे पार पडणार असून, त्यामुळे संपूर्ण बाजारपेठेला मोठा आर्थिक बूस्ट मिळत आहे. सध्या तापमान 40 अंशांच्या घरात असतानाही लग्नसोहळ्यांची रंगत कमी झालेली नाही. दुपारच्या वेळेत काही प्रमाणात मरगळ असली, तरी सायंकाळी आणि रात्री विवाह सोहळ्यांना विशेष गर्दी होत आहे. थंड पेय, आइस्क्रीम, फळांचे स्टॉल यांनाही मोठी मागणी वाढली आहे.

यंदाच्या लग्नसराईत जुनीच लोकप्रिय गाणी पुन्हा ट्रेंडमध्ये आली असून, वरातींमध्ये याच गाण्यांवर नाचण्याचा जल्लोष रंगताना दिसत आहे. याशिवाय, या लग्नसराईमुळे हजारो युवकांना हंगामी रोजगार उपलब्ध झाला असून, बँड पथक, केटरिंग, सजावट, वाहन सेवा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम मिळत आहे.

## श्री भैरवनाथ यात्रेनिमित्त २८ एप्रिल पासून धार्मिक कार्यक्रम

**चाकण (दै. संध्या)**

श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ चाकण यांच्या संयुक्त विद्यमाने चाकण येथे मंगळवार (दि.२८) ते गुरुवार (दि.३० एप्रिल) या सलग तीन दिवसांच्या कालावधीत विविध अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष किसनराव गोरे यांनी दिली.

चाकण येथे मंगळवारी (दि.२८) सायंकाळी सात ते नऊ या वेळात समाज प्रबोधनकार ह.भ.प. पोपट महाराज राक्षे यांची कीर्तन रुपी सेवा होणार आहे. त्यानंतर दहा वाजता झित्राईमळा येथील झित्राईमाता महिला भजनी मंडळाचा हरिजागराचा कार्यक्रम होणार आहे. बुधवारी (दि.२९) विद्या वाचस्पती ह.भ.प. डॉ. रविदासजी महाराज शिरसाठ यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर येथील सुभाष चौकातील शनेश्वर भजनी मंडळाचा हरी जागराचा कार्यक्रम होईल.

गुरुवारी (दि.३०) भागवताचार्य ह.भ.प. भगिरथ महाराज काळे यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर येथील श्री भैरवनाथ मंदिरात काल्याच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

किर्तनरुपी सेवेत व्यासपीठ चालक म्हणून समाज प्रबोधनकार ह.भ.प. कल्याण महाराज कल्याणकर हे काम पाहणार आहेत. मृदंगाचार्य, गायनाचार्य व विणेकरी म्हणून संत रघुनाथ बाबा आश्रमातील विद्यार्थी किर्तन साथ देणार आहेत.



# “ साहेब होण्याबरोबरच चांगला माणूस बना!”

**प्राचार्य डॉ. वायदंडे यांचा भावी अधिकाऱ्यांना मोलाचा सल्ला**





**नीरा (दै. संध्या)**

“तू साहेब होतोयस तर नक्की हो... पण त्याआधी एक चांगला माणूस हो!” असा थेट आणि विचार करायला लावणारा सल्ला देत सोमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी एमपीएससीत यश मिळवलेल्या भावी अधिकाऱ्यांना जीवनमूल्यांची जाणीव करून दिली. पुरंदर तालुक्यातील नीरा येथे एमपीएससी परीक्षेत यश संपादन केलेल्या आदित्य सूर्यवंशी, रुपेश कांबळे आणि ओंकार लकडे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सोमवारी ग्रामपंचायत कार्यालयात सत्कार करण्यात आला. यामध्ये कांबळे आणि लकडे यांची नगररचनाकार म्हणून, तर सूर्यवंशी यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाली आहे. तसेच मोनिका कांबळे यांची पंचायत समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. वायदंडे म्हणाले, “शिक्षणामुळे माणूस सुशिक्षित होतो, पण खरे संस्कार हे आई-वडिलांकडूनच मिळतात. आजच्या मोबाईल आणि रीलच्या जगात पालक, शिक्षक आणि मुलेही हरवले आहेत. त्यामुळे संस्कारांचा अभाव जाणवतो. मात्र नीरा येथील या तरुणांच्या यशामागे त्यांच्या पालकांचे संस्कार मोठे आहेत.”

ते पुढे म्हणाले, “प्रत्येक पालकाने आपल्या मुलांमध्ये वाचनाची सवय लावली पाहिजे. चांगले साहित्य वाचणारी पिढीच देश घडवू शकते. नोकरीत अनेक प्रलोभने येतील, पण त्याला बळी पडू नका. प्रामाणिकपणा, नैतिकता आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी जपा. चांगला अधिकारी तोच, जो माणुसकी जपतो.” मोनिका कांबळे यांच्या निवडीबद्दलही त्यांनी विशेष कौतुक व्यक्त करत, “त्या केवळ एका मतदारसंघाचे नव्हे, तर सर्व महिलांचे प्रतिनिधित्व करत आहेत,” असे सांगितले. तसेच देशाची प्रगती ही विधिमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्या प्रामाणिक कामगिरीवर अवलंबून असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाला मार्केट कमिटीचे संचालक विक्रम दगडे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य विराज काकडे, पंचायसमितीचे माजी उपासभापती गोरखनाथ माने, नीरेचे माजी उपसरपंच राजेश काकडे, दीपक काकडे, बाळासाहेब भोसले, सुदाम बंडगर, कल्याण जेधे, विजय शिंदे, योगेंद्र माने स्वप्नील कांबळे,माजी ग्रामपंचायत सदस्य अनिल चव्हाण, राधा माने, वैशाली काळे, अभिषेक भालेराव, अनंता शिंदे, दादा गायकवाड,सुजित वाडेकर, ग्रामसंघाच्या आध्यक्षा मीनाक्षी भालेराव, प्रभारी पोलिस पाटील राहुल शिंदे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी उपसरपंच राजेश काकडे अमोल साबळे सुरेंद्र जेधे,ॲड. आदेश गिरमे, विराज काकडे, यांनी आपले मनोगत व्यक्त करत सत्कारमूर्तींचे अभिनंदन करत त्यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दीपक काकडे यांनी केले,सूत्रसंचालन राजेश काकडे यांनी केले, तर आभार राधा माने यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गणवेश-पुस्तकांसाठी शाळांची सक्ती बंद!

कांदिवली (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके किंवा इतर शैक्षणिक साहित्य ठरावीक दुकानातूनच खरेदी करण्याची सक्ती करणाऱ्या शाळांवर आता कारवाई होणार आहे. राज्यातील सर्व खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना अशा सक्तीपासून दूर राहण्याचे स्पष्ट निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे पालकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. राज्यातील सर्व खासगी शाळा शैक्षणिक साहित्य आणि गणवेश ठरावीक दुकानातून खरेदी करा, असे पालकांना सांगतात. याबाबत अनेक पालकांनी, पालक संघटनांनी आणि ग्लोबल पेरेंट्स टीचर्स असोसिएशनने शिक्षण विभागाला तक्रारी केल्या होत्या. याबाबत शासनाने निर्णय घेऊन परिपत्रक काढले आहे. या निर्णयाच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी शिक्षण विभागाने नव्याने परिपत्रक जारी करत सर्व शिक्षणाधिकारी व प्रशासन अधिकाऱ्यांना दक्ष राहण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही शाळेने विद्यार्थ्यांवर विशिष्ट खासगी प्रकाशनांची पुस्तके खरेदी करण्याचेही बंधन घालू नये, असेही आदेशात नमूद आहे. राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसई शाळांनी मान्यताप्राप्त पाठ्यपुस्तकेच वापरावीत, असे निर्देश देखील देण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे पालकांना शैक्षणिक साहित्य खरेदीत मोकळीक मिळणार असून शाळांकडून होणाऱ्या आर्थिक सक्तीला आळा बसणार आहे. पालकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास तत्काळ चौकशी करून संबंधित शाळेवर कारवाई करण्यात येणार आहे.



### सिद्धिविनायक मंदिरात लिलावातून 96 लाख रुपये जमा

मुंबई (दैनिक संध्या) : प्रभादेवी येथील सिद्धीविनायक मंदिरात अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात आलेल्या दागिन्यांच्या लिलावाला भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या लिलावातून एकूण 96 लाख 17 हजार 511 रुपये इतकी रक्कम न्यासाकडे जमा झाली आहे. मंदिर न्यासाच्या वतीने श्रींच्या चरणी भक्तांनी अर्पण केलेल्या सोन्याच्या अलंकारांचा हा जाहीर लिलाव रविवारी पार पडला. लिलावात एकूण 171 सोन्याचे अलंकार (वजन 684 ग्रॅम 820 मिलीग्रॅम) ठेवण्यात आले होते. त्यापैकी 156 अलंकार (वजन 577 ग्रॅम 680 मिलीग्रॅम) विक्रीस गेले. या विक्रीतून 90 लाख 47 हजार 211 रुपये प्राप्त झाले, तर चांदीच्या नाण्यांच्या विक्रीतून 5 लाख 70 हजार 300 रुपये जमा झाले, अशाप्रकारे एकूण रक्कम 96 लाख 17 हजार 511 रुपये इतकी झाल्याची माहिती न्यासाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वीणा पाटील यांनी दिली. सिद्धीविनायक मंदिर हे मुंबईकरांचे श्रद्धास्थान असून, येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. बाप्पाला अर्पण केलेले दागिने आशीर्वादाच्या स्वरूपात मिळावेत, या भावनेतून भक्त मोठ्या उत्साहाने या लिलावात सहभागी होतात. ही परंपरा मंदिर न्यासाने अनेक वर्षांपासून जपली आहे. रविवारी लिलावासाठी आलेल्या भाविकांमध्ये मुंबईसह राज्यभरातून भक्त सहभागी झाले होते. अनेकांनी बाप्पाच्या चरणी अर्पण केलेले अलंकार प्रसाद स्वरूपात मिळावेत, या श्रद्धेने स्पर्धात्मक बोली लावत सहभाग नोंदवला.




### अनुदानाआडून 'शाळा बंद'चा डाव निर्णयाविरोधात मराठी अभ्यास केंद्र आक्रमक

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील 324 माध्यमिक शाळा, 412 तुकड्या तसेच 505 कनिष्ठ महाविद्यालये आणि त्यातील 382 तुकड्यांना निकषांची पूर्तता न झाल्याच्या कारणावरून वेतन अनुदानासाठी अपात्र ठरवत त्यांना स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर जाण्याचे आदेश देण्याच्या शिक्षण विभागाच्या 2 एप्रिलच्या निर्णयाविरोधात मराठी अभ्यास केंद्राने आक्रमक भूमिका घेतली आहे. हा निर्णय शाळांना जाणीवपूर्वक अनुदानबाह्य करण्याचा डाव असून तो तातडीने मागे घ्यावा अन्यथा, राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. शालेय शिक्षण विभागाने राज्यातील 324 माध्यमिक शाळा, 412 तुकड्या तसेच 505 कनिष्ठ महाविद्यालये आणि त्यातील 382 तुकड्यांना वेतन अनुदानासाठी अपात्र घोषित केले आहे. या सर्व संस्थांना 30 एप्रिल 2026 पर्यंत स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर मान्यता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयाचा सर्वाधिक फटका ठाणे मुंबईला अधिक बसला आहे. ठाणे (68), मुंबई (54), पालघर (46) आणि रायगड (21) या जिल्ह्यांत सर्वाधिक माध्यमिक शाळा अपात्र ठरल्या आहेत. त्याखालोखाल पुणे (26), नाशिक (19), जळगाव (17), नंदुरबार (14), सोलापूर (13) आणि धुळे (11) या जिल्ह्यांचाही मोठा समावेश आहे. अहमदनगर (8) आणि सांगली (20) येथेही लक्षणीय संख्या आहे, तर बीड, लातूर, धाराशिव, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत प्रत्येकी एक शाळा अपात्र ठरली आहे. कनिष्ठ महाविद्यालयांच्या बाबतीत बीड (32), छत्रपती संभाजीनगर (30), नागपूर (27), पुणे (24) आणि सातारा (24) हे जिल्हे आघाडीवर आहेत. याशिवाय कोल्हापूर (20), परभणी (18), सांगली (18), ठाणे (16), रत्नागिरी (15) आणि अहमदनगर (14) या जिल्ह्यांनाही मोठा फटका बसला आहे. या शाळेत सद्यस्थितीत लाखो विद्यार्थी शिकत आहेत. शिक्षण क्षेत्रातील जबाबदारीपासून दूर जात असून सरकारी शाळांचे खासगीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. इतर देशांत शाळांचे सरकारीकरण होत असताना महाराष्ट्रात उलट धोरण राबवले जात असल्याची टीकाही करण्यात आली आहे.

# डोंबिवलीत ट्रेन रूळावरून घसरली

## सेंट्रल रेल्वे लाईनवरील वाहतूक मंदावली



मुंबई (दै. संध्या)

सेंट्रल रेल्वे ट्रेन डोंबिवली पीएफ १ इथं रुळावरून घसरली आहे. याचा परिणाम कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या रेल्व वाहतुकीवर झाला असून रेल्वे वाहतूक मंदावली आहे. कल्याणच्या दिशेने जाणाऱ्या गाड्यांचा वेग मंदावला असून या घटनेचा परिणाम हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सकडे जाणाऱ्या गांड्यावर देखील लवकरच होण्याची शक्यता आहे. त्यामुळं प्रवाशांनी त्या प्रमाणे त्यांच्या प्रवासाची आखणी करावी असा सल्ला देण्यात आला आहे.

**इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांचे हाल**

दरम्यान, रविवारी मेगा ब्लॉक असूनही आठवड्याच्या पहिल्याच दिवशी लोकलचा खोळंबा झाल्यानंतर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. आसनगाव ते ठाणे आणि पुढे पनवेल असा लांबचा प्रवास करून विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचायचे होते. इंजिनिअरिंग प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या सीईटी परीक्षेचे रिपोर्टिंग सकाळी ७:३० वाजता होते, तर साडेआठ वाजता गेट बंद होणार होते.

या वेळेचे नियोजन करून शेकडो विद्यार्थी पहाटेच स्थानकावर हजर झाले होते. मात्र, ऐनवेळी पहिलीच गाडी रद्द झाल्याची घोषणा झाल्याने विद्यार्थ्यांच्या पाया खालची जमीनच सरकली. ३ ते ४ तासांचा प्रवास असल्याने वेळेत पोहोचू की नाही, या चिंतेने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर भीती स्पष्ट दिसत होती.

**प्रवाशांचा संताप आणि रेल्वेची तात्पुरती मलमपट्टी**

पहिली लोकल रद्द झाल्यामुळे केवळ विद्यार्थीच नव्हे, तर मुंबईच्या दिशेने जाणारे चाकरमानीही संतप्त झाले. स्थानकावर प्रवाशांचा दबाव आणि गोंधळ वाढल्याचे पाहून रेल्वे प्रशासनाची धावपळ उडाली. अखेर या गोंधळावर तोडगा म्हणून मध्य रेल्वेने नंदीग्राम एक्सप्रेसला आसनगाव आणि वाशिंद स्थानकावर तात्पुरता थांबा देण्याचा निर्णय घेतला. या एक्सप्रेसमधून विद्यार्थी आणि नोकरदारांना पुढे रवाना करण्यात आले.

## 700 पोलिसांच्या मेअखेर किंवा जूनमध्ये बदल्या

### बदली प्रक्रियेत सहायक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई पदांच्या कर्मचाऱ्यांचा समावेश

मुंबई (दै. संध्या)




नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात जूनच्या पहिल्या आठवड्यात सुमारे 700 हून अधिक पोलिसांच्या सार्वत्रिक बदल्या होण्याची शक्यता आहे. एप्रिलमध्ये याबाबत पसंतीची तीन ठिकाणे कर्मचाऱ्यांनी बदलीच्या अर्जात नमूद करण्याचे निर्देश पोलीस आयुक्तांना दिले आहेत. त्यामुळे येत्या मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात पोलीस कर्मचाऱ्यांच्या सार्वत्रिक बदल्या होतील.

या बदली प्रक्रियेत सहायक पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस शिपाई पदांच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. एकाच पोलीस ठाण्यात पाच वर्षे पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांसह विनंती बदलीसाठी अर्ज केलेल्या कर्मचाऱ्यांचाही प्रक्रियेत समावेश असणार आहे.

नवी मुंबई पोलीस आस्थापना मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार या बदल्या केल्या जाणार आहेत. पोलीस आयुक्तांनी बदलीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून तीन पसंतीच्या ठिकाणांसह अर्ज एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात मागवले आहेत. त्यानुसार पोलीस उपायुक्त मुख्यालयाकडून आलेल्या अर्जांची छाननी आणि पात्र कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्याचे काम सुरु आहे.

एप्रिलपासून या बदली प्रक्रियेला सुरूवात झाली. अखेर सर्व कर्मचांऱ्याचे सेवा पुस्तक तपासणीअंती पाच वर्षे कालावधी पूर्ण केलेले कर्मचारी, विनंती अर्ज केलेले कर्मचारी आणि मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांची यादी मेच्या पहिल्या आठवड्यात तयार केली जाणार आहे. त्यानंतर आस्थापना मंडळाच्या बैठकीत बदलीसाठी पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी मंजुरीला घेतली जाणार आहे. त्यानंतर पोलीस आयुक्तलयातील आस्थापना मंडळाच्या निर्णयानुसार या बदल्या मे अखेर किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित आहेत.

पोलीस ठाणे, नियंत्रण कक्ष, पोलीस मुख्यालय, अतिक्रमण, अंमली विरोधी शाखा, वाहतूक शाखा, गुन्हे शाखा, आरबीआय, अतिक्रमण, मोटार वाहन विभाग आणि विशेष शाखेत कालावधी पूर्ण केलेल्या पोलिसांचा बदली प्रक्रियेत समावेश आहे.

## दादर स्थानकावर नवा प्लॅटफॉर्म

मुंबई (दै. संध्या)




विक्रमी वर्दळीच्या दादर स्थानकावरील भार हलका व्हावा म्हणून मध्य आणि पश्चिम रेल्वे कॉरिडॉरला जोडणारा नवा प्लॅटफॉर्म उभारण्यात येणार आहे. पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या विस्तार प्रकल्पाचाच हा एक भाग असेल.

पिक अवरमध्ये अधिकाधिक लोकल गाड्या धावणे शक्य व्हावे म्हणून हा मार्गिकेचा विस्तार केला जाणार आहे. या प्रकल्पासाठी पश्चिम बाजूने भूसंपादन कधीच सुरू झाले आहे. खासकरून दळवी नगर भागातील 46 अतिक्रमणे त्यासाठी निश्चित केली असून तेथील बहुतांश रहिवाशांना जागा रिकामी करण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

यातील काही अतिक्रमणे हटवण्याचे प्रयत्न कायदेशीर कचाट्यात अडकले आहेत. बहुतांश अतिक्रमणांचा प्रश्न पुनर्वसन प्रकल्पातून मार्गी लावला जाईल असे दिसते. त्यातून अनेक अतिक्रमीत बांधकामे पाडली गेली आहेत.

दादर स्थानकावर नवा प्लॅटफॉर्म बांधला गेला तर पश्चिम आणि मध्य रेल्वेदरम्यान उपनगरी गाड्या वेगवेगळ्या करण्याचे व्यवस्थापन सुधारेल. यामुळे लोकल गाड्यांची कोंडी करणारी ठिकाणे कमी होऊन लोकल गाड्यांचे वेळापत्रकही सुधारेल. पिक अव्हरमध्ये कोणताही गोंधळ होणार नाही. दादरच्या नव्या प्लॅटफॉर्मच्या निमित्ताने या स्थानकातील सर्वच प्लॅटफॉर्मचे नंबरही बदलतील आणि प्रवाशांना इच्छित प्लॅटफॉर्मवर जाणे किंवा आपली गाडी सहज गाठणे शक्य होईल.

## एका क्लिकवर सिलिंडर घरपोच!


मुंबई (दै. संध्या)

वाढत्या मागणीच्या काळातही वितरकांनी वितरणाची शिस्त कायम राखली आहे. वेग आणि सुरक्षिततेचा समतोल साधत सिलेंडर आधारित प्रमाणीकरणाद्वारे वितरित केला जातो. हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने आधुनिक तंत्रज्ञानामुळे वितरणाचे काम सुरळीत होण्यास मदत होत आहे. त्यामुळे 1 ते 18 एप्रिल दरम्यान एचपीसीएलच्या देशभरात 230 लाखांहून अधिक एलपीजी सिलेंडर वितरीत करणे शक्य झाले आहे.

ग्राहक एलपीजी सिलेंडर बुक करतात तेव्हा ग्राहकांना वेळेवर घरपोच सेवा मिळावी म्हणून ही प्रणाली डिजिटल प्लॅटफॉर्म, वितरक, लॉजिस्टिक नेटवर्क आणि प्रत्यक्ष वितरण करणारी टीम एकत्रित काम करते. ग्राहकाद्वारे सिलेंडरचे बुकिंग झाले की, त्वरित जवळच्या वितरकाकडे पाठवली जाते, जिथे उपलब्ध साठा आणि वितरणाचे वेळापत्रक यांचा समन्वय साधला जातो.

## पवईत ३ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार

मुंबई (दै. संध्या)



पवई येथे एका तीन वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच जन्मदात्या पित्यासह वयोवृद्ध आजोबांनी लैंगिक चाळे केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी आरोपी पित्यासह वयोवृद्ध आजोबाविरुद्ध पवई पोलिसांनी लैंगिक अत्याचारासह पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मात्र न्यायालयाच्या आदेशानंतर ती तिच्या मुलीला तिच्या वडिलांकडे घेऊन जात होती. मुंबईत तिचे वडिल आणि आजोबा पवईतील एका फ्लॅटमध्ये तिच्यासोबत वेळ घालवत होते. डिसेंबर 2025 ते एप्रिल 2026 या कालावधीत तिच्या वडिलांनी तिच्याशी अश्लील चाळे, तर तिच्या वयोवृद्ध आजोबांनी लैंगिक अत्याचार केला होता. अलीकडेच हा प्रकार तक्रारदार महिलेच्या लक्षात आला होता.

या प्रकारानंतर तिने पवई पोलिसांना घडलेला प्रकार सांगून तिच्या पतीसह सासऱ्याविरुद्ध तक्रार केली. या तक्रारीनंतर या दोघांविरुद्ध पोलिसांनी लैंगिक अत्याचारासह पोक्सोच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात त्यांना पाहिजे आरोपी दाखविण्यात आले आहे. ते दोघेही बंगलोरला राहत असल्याने त्यांना चौकशीसाठी हजर राहण्याचे लवकरच समन्स बजाविले होते. चौकशीनंतर त्यांच्याविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# १६१ साहाय्यक अभियंत्यांची होणार पदोन्नती

## १७ एप्रिल रोजी महापालिका मुख्यालयात प्रमोशन कमिटीची बैठक पार पडली

मुंबई (दै. संध्या)



मुंबई महानगरपालिकेत गेल्या 3 ते 4 वर्षांपासून साहाय्यक अभियंता संवर्गातील अभियंत्यांच्या रखडलेल्या पदोन्नतीला अखेर मुहूर्त मिळाला असून तब्बल 161 साहाय्यक अभियंत्यांची कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस पदोन्नती झालेल्या कार्यकारी अभियंत्यांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित होणार असल्याची माहिती नगर अभियंता विभागातील प्रशासनाकडून देण्यात आली.

महापालिकेतील यांत्रिकी आणि सिव्हिल या दोन विभागांत अभियंते कार्यरत आहेत. सिव्हिल (स्थापत्य) विभागातील 161 साहाय्यक अभियंत्यांची प्रशासकीय राजवटीत पदोन्नती रखडली होती. मात्र आता महापालिकेत सत्ताधारी पक्षातील नगरसेवक बहुमताने सभागृहात विराजमान झाल्याने या साहाय्यक अभियंत्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाला आहे.

17 एप्रिल रोजी महापालिका मुख्यालयात प्रमोशन कमिटीची बैठक पार पडली. या बैठकीत सुमारे 161 साहाय्यक अभियंत्यांची पदोन्नती करण्याचे ठरविण्यात आले आहे. तसा प्रस्ताव नगर अभियंता विभागाकडून लवकरच महापालिकेच्या सभागृहात सादर करण्यात येणार आहे. महापालिकेच्या विभाग कार्यालयात गेल्या 3 ते 4 वर्षांपासून विभाग कार्यकारी अधिकारी, पदनिर्देशक अधिकारी (डीओ) तसेच नगर विकास विभाग, बिल्डिंग व इमारत विभाग, कोस्टल रोड, पूल, रस्ते विभाग, घनकचरा व्यवस्थापन विभाग, मल:निसारण जलवाहिनी, सीटीआरसी, मालमत्ता असे सुमारे 30 विविध खात्यांमध्ये कार्यकारी अभियंता संवर्गातील पदे रिक्त होती. यामुळे याचा थेट परिणाम हा विकासकामांवर होत होता.

विभाग कार्यालयांसह इतर विभागांचा कार्यभार चालविण्यासाठी सहाय्यक अभियंत्यांना प्रभारी कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला होता.

या विभागांत येणार कार्यकारी अभियंते : महापालिकेतील 16 विभाग कार्यालये, 23 विभागांतील पदनिर्देशक अधिकारी आणि नगर विकास, इमारत व प्रप्रोजर विभाग, दक्षता विभाग, रस्ते वाहतूक, प्रोजेक्ट, जल अभियंता, मल:निसारण, सिव्हरेज ऑपरेशन, इमारत व परिरक्षण, शाळा व पायाभूत सुविधा, मध्यवर्ती खरेदी खाते.

या वॉर्डांत होणार नियुक्ती: बी, सी, डी, जी.उत्तर, जी.दक्षिण, एच.पूर्व, एच.वेस्ट, एल, एम.पूर्व, एम.वेस्ट, पी.पूर्व, पी.दक्षिण, आर.दक्षिण, आर.उत्तर, एस आणि टी वॉर्ड.

या विभागांत पदनिर्देशक अधिकारी म्हणून नियुक्ती: ए, बी, सी, डी, एफ.उत्तर, एफ.दक्षिण, जी.उत्तर, जी.दक्षिण, एच.पश्चिम, एच.पूर्व, के.पूर्व, के.पश्चिम, एल, एम.पूर्व, एम.पश्चिम, एन, पी.उत्तर, पी.दक्षिण, पी.पश्चिम, आर.दक्षिण, आर.मध्य, सी आणि टी विभाग.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जागे व्हा नाहीतर पुढची पिढी आपल्या डोळ्यांसमोर नष्ट होताना पाहावी लागेल..

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : 'ड्रग्सचा' विळखा पुणे वाचवायचं की गमवायचं ? एकेकाळी 'विद्येचं माहेरघर' म्हणून देशभरात ओळखलं जाणारं पुणे आज एका भीषण वास्तवाशी झुंज देत आहे. ज्या शहराने ज्ञान, संस्कार आणि विचारांची परंपरा घडवली, त्याच शहरात आज गांजा, मेफेड्रोन, कोकेनसारख्या अंमली पदार्थांचा खुलेआम व्यापार सुरू आहे. महाविद्यालयांच्या गेटसमोर, पबच्या मागे, नव्या उपनगरांच्या कोपऱ्यात, अगदी पानटपऱ्यांवरही हा 'मृत्यूचा माल' विकला जातोय आणि आपण सगळे फक्त बघ्याची भूमिका घेतोय. ही परिस्थिती अचानक निर्माण झालेली नाही. ती निर्माण होऊ दिली गेली आहे. पोलीस कारवाई करतात, छापे पडतात. हे खरं आहे. पण प्रश्न अजूनही उभाच आहे. मोठे मासे अजूनही मोकाट का? कोणाच्या छत्रछायेखाली हे रॅकेट इतक्या बिनधास्तपणे वाढत आहे? किरकोळ विक्रेत्यांना पकडून खऱ्या सूत्रधारांना वाचवलं जातंय का? जर असं असेल, तर हा फक्त गुन्हा नाही तर ही संपूर्ण व्यवस्थेच्या अपयशाची जाहीर कबुली आहे. पण दोष फक्त व्यवस्थेचा नाही. आपणही तितकेच जबाबदार आहोत. आज पालक मुलांना महागडे मोबाईल देतात, पण वेळ देत नाहीत. शाळा आणि महाविद्यालये गुणांच्या स्पर्धेत अडकली आहेत, पण विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष होतंय. समाज 'आपल्याला काय?' म्हणत डोळेझाक करतो आणि मग 10-12 वर्षांची निष्पाप मुलंही या नशेच्या विळख्यात अडकतात. ही पिढी बिघडलेली नाही ती आपण बिघडू दिली आहे. आज ड्रग्स विक्री हा फक्त 'धंदा' राहिलेला नाही. तो एक संघटित उद्योग बनला आहे. आणि आपण जर अजूनही शांत बसलो, तर उद्या आपल्या घरातील मुलगा किंवा मुलगी या दलदलीत अडकायला वेळ लागणार नाही. म्हणून आता फक्त चर्चा नाही. निर्णायक कृतीची वेळ आली आहे. मोठ्या ड्रग्स रॅकेटवर थेट आणि कठोर कारवाई झालीच पाहिजे. ड्रग्स माफियांना संरक्षण देणाऱ्यांची नावे जाहीर झालीच पाहिजेत. जलदगती न्यायालयात खटले चालवून कठोर शिक्षा झालीच पाहिजे. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात व्यसनविरोधी शिक्षण व समुपदेशन बंधनकारक झालेच पाहिजे. आणि सर्वात महत्त्वाचं नागरिकांनी भीती सोडून पुढे येणं अत्यावश्यक आहे. ही लढाई फक्त पोलीसांची नाही ती प्रत्येक आई-वडिलांची आहे, प्रत्येक शिक्षकाची आहे, आणि प्रत्येक सजग नागरिकाची आहे. आज जर आपण उभे राहिलो नाही, तर उद्या पुण्याची ओळख 'विद्येचं माहेरघर' म्हणून नाही, तर 'ड्रग्सचं अड्डा' म्हणून होईल. आणि तेव्हा पश्चात्ताप करून काहीच उपयोग होणार नाही निर्णयाचा क्षण आज आहे. उद्या नाही. जागे व्हा नाहीतर पुढची पिढी आपल्या डोळ्यांसमोर नष्ट होताना पाहावी लागेल.



### बारामतीत महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात साजरी

बारामती (दैनिक संध्या) : महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त लिंगायत समाजाच्या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या आरोग्य शिबिरात विविध रुग्णालयांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात आली.मुक्ताई हॉस्पिटलच्या डॉ.मीनल गवसणे यांनी त्वचारोग तपासणी केली. बारामती हॉस्पिटलच्या वतीने बीपी,शुगर, ऑक्सिजन व ईसीजी तपासणी करण्यात आली.एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय,पुणे यांच्या माध्यमातून मोफत नेत्र तपासणी तसेच मोतीबिंदू व काचबिंदू शस्त्रक्रिया मोफत करण्याची सुविधा तसेच अल्प दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. शिवम मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, वेळापूर यांच्या वतीने हार्निया, अपेंडिक्स व मुतखडा यासंदर्भात तपासणी करण्यात आली.या शिबिराचा सुमारे १०० समाज बांधवांनी लाभ घेतला.नेत्र तपासणीदरम्यान ३ मोतीबिंदू रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया होणार आहेत.याशिवाय डॉ.मीनल गवसणे यांनी १० मे ते २० मे दरम्यान समाज बांधवांसाठी मोफत सल्ला देणार असल्याचे जाहीर केले.यावेळी बारामती शहर पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी, नगरसेवक यशपाल पोटे,नगरसेविका अनुप्रीता ताबे (डांगे),माजी ज्येष्ठ नगरसेवक सुभाष ढोले उपस्थित होते.यावेळी समाजाचे अध्यक्ष समीर ढोले,माधुरी झाडबुके,हेमा बोधे व विश्वस्त मंडळ तसेच रोहित पिल्ले,अभिषेक ढोले, विजय गाढवे,सचिन शाहीर, ॲड.अमित ढोले,तनिष्क ढोले यांच्यासह बसवप्रेमी उपस्थित होते.




### अरणेश्वर मंदिर सीमा भिंत प्रश्नी खासदार मुरलीधर मोहोळ यांनी हस्तक्षेप करावा;

धानोरी (दैनिक संध्या) : धानोरी येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अरणेश्वर गणेश मंदिर परिसरात संरक्षण विभागाकडून सुरू असलेल्या सीमा भिंतीच्या बांधकामामुळे नवा पेच निर्माण झाला आहे. ही भिंत जर प्रस्तावित जागेवर बांधली गेली, तर भाविकांना मंदिरात दर्शनासाठी जाण्याचा मार्ग पूर्णतः बंद होणार आहे. हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्याने, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून संरक्षण विभागाला वस्तुस्थिती दर्शवणारे पत्र द्यावे, अशी आग्रही मागणी आता गणेशभक्तांकडून केली जात आहे.धानोरी टेकडीवर अनेक दशकांपासून अरणेश्वर गणपतीचे मंदिर असून ते परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचे मुख्य केंद्र आहे. संरक्षण विभागाने सुरक्षेच्या कारणास्तव सीमा भिंतीचे काम हाती घेतले असले, तरी या भिंतीचा नकाशा मंदिराच्या प्रवेशद्वाराला आणि मोकळ्या जागेला बाधित करणारा आहे. जर हे काम असेच सुरू राहिले, तर भविष्यात भाविकांना मंदिरात प्रवेश करणे अशक्य होईल, अशी भीती स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. संरक्षण खाते हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असल्यामुळे स्थानिक प्रशासकीय प्रयत्नांना मर्यादा येत आहेत. खासदार मुरलीधर मोहोळ हे पुणे लोकसभा मतदारसंघाचे केंद्रात प्रतिनिधित्व करत आहेत. "खा. मुरलीधर मोहोळ यांनी या प्रकरणात लक्ष घालून संरक्षण खात्याला गणेशभक्तांच्या भावना कळवाव्यात आणि मंदिराची जागा सोडून इतर ठिकाणी संरक्षक भिंत बांधण्याबाबत अधिकृत पत्र द्यावे," अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.



# जेजुरीत बैलगाडा शर्यतीचा थरार

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या नगरीची ग्रामदेवता जानाई देवीच्या यात्रेनिमित्त आयोजित मार्तंड केसरी बैलगाडा शर्यतीचा थरार नागरिकांना पाहण्यास मिळाला.

या बैलगाडा शर्यतीत सुमारे सातशे पंचवीस बैलगाडा सहभागी झाला होता.

प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व मार्तंड केसरी चषक फुरसुंगी येथील पृथ्वीराज खुटवड यांच्या जीवा देवाच्या जोडीने पटकाविला.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत तब्बल दीडशे वर्षानंतर पहिल्यांदाच ग्रामदेवता जानाई देवीची यात्रा भरवण्यात आली होती.

जेजुरी ग्रामदेवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्ट, अखिल जेजुरी बैलगाडा मंडळ आणि श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाच्या वतीने भव्य अशा मार्तंड केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते.

जेजुरी धालेवाडी रस्त्यावरील खंडोबा सोमवती पालखी मार्गावरील मैदानात या बैलगाड्या शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुण्या सहित अनेक जिल्ह्यातील सुमारे सातशे पंचवीस बैलगाडाची नोंद झाली. सकाळी नऊ ते रात्री सात वाजे पर्यंत 73 फेऱ्यात बैलगाडा शर्यतीचा थरार शौकीन रसिकांनी अनुभवला. ही शर्यत पाहण्यासाठी हजारो शौकीन उपस्थित होते.

प्रथम क्रमांक विजेत्या जीव देवा बैलगाड्यास एक लाख रुपये रोख व मार्तंड केसरी चषक देवून गौरविण्यात आले. पुढील विजेते द्वितीय क्रमांक चंद्रगिरी महाराज कृपा , मांजरी, तृतीय क्रमांक शिट्टी राजा फॅन्स क्लब जांभूळवाडी, चतुर्थ क्रमांक अविनाश भालेघरे शिंद ता भोर, पाचवा क्रमांक दादा आगलावे मोण्या ड्रायव्हर जेजुरी, सहावा क्रमांक पद्मावती प्रतिष्ठान भूगाव मुळशी, सातवा क्रमांक लक्ष्या फॅन्स दोरगेवाडी जेजुरी, आठवा क्रमांक शंभू फॅन्स क्लब वाठार बुद्रुक, आणि नववा क्रमांक अवधूत काकडे पांगारे पुरंदर अशा नऊ विजेत्या बैलगाडा मालकांना रोख रक्कम व मानाची ढाल देवून सन्मानित करण्यात आले.

**बकासुरचा सन्मान**

महाराष्ट्राच्या बैलगाडा शर्यतीत बारा वेळा हिंद केसरी चषक पटकावणारा व बैलगाडा शर्यतीत देव मानला जाणारा बकासुर ला शर्यतीच्या आखाड्यात आणल्या नंतर बैलगाडा शौकीनांनी एकच जल्लोष केला. यावेळी जानाई देवी मंदिर ट्रस्टच्या वतीने मालक मोहील धुमाळ व बकासुर चा सन्मान करण्यात आला. ग्रामदेवता जानाई देवीच्या दीडशे वर्षानंतर झालेल्या या यात्रेत भव्य कुस्तीचा आखाडा व मार्तंड केसरी बैलगाडा शर्यत अतिशय दिमाखात पार पडली. जेजुरी ग्रामदेवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्ट, अखिल जेजुरी बैलगाडा मंडळ आणि श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळ व ग्रामस्थांनी अतिशय शिस्तबद्ध व उत्कृष्ट नियोजन केले.

## हनी ट्रॅपचा पर्दाफाश; पीएसआयकडून ५० लाखांची खंडणी मागणी

**बारामती (दै. संध्या)**

बारामतीमध्ये हनी ट्रॅपच्या माध्यमातून फसवणूक करून खंडणी उकळणाऱ्या एका रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, एका पोलिस उपनिरीक्षकालाच जाळ्यात ओढून त्यांच्याकडे 50 लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. याप्रकरणी आरोपी प्रशांत सरतापे आणि त्याच्या पत्नीविरोधात बारामती शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी पोलिस उपनिरीक्षक अमरनाथ कुंभार हे बारामतीतील एका प्रशिक्षण केंद्रात गेस्ट लेक्चरर म्हणून येत असताना त्यांची काही लोकांशी ओळख झाली होती. याचाच फायदा घेत एका महिलेने मार्गदर्शनाच्या नावाखाली त्यांच्याशी संपर्क वाढविला. वारंवार फोन आणि व्हिडीओ कॉल करून जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संशय आल्याने कुंभार यांनी तिचा नंबर ब्लॉक केला; मात्र दुसऱ्या नंबरवरून संपर्क करून त्यांना धमकावण्यास सुरुवात झाली.

आरोपींनी व्हिडीओ कॉलचे स्क्रीन रेकॉर्डिंग करून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. इतकेच नव्हे तर, 'खोटा बलात्कार आणि ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करू,' अशी भीती दाखवून सुरुवातीला 50 लाख रुपयांची मागणी केली. तडजोड करीत ही रक्कम 25 लाख आणि शेवटी 10 लाखांपर्यंत खाली आली. 5 ते 13 एप्रिल या कालावधीत आरोपींनी कुंभार यांच्यावर प्रचंड मानसिक दबाव टाकला होता.

## जेजुरीच्या जानाई मंदिरात चैत्रगौरी हरिद्रा कुंकुम सोहळा


**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवी मंदिरात चैत्रगौरी हरिद्रा कुंकुम सोहळा व दोलोत्सव सोहळा अतिशय उत्साहात साजरा झाला.

जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवी हे जागृत श्रद्धास्थान आहे. गतवर्षी सुमारे चार कोटी रुपये खर्चून देवीचे भव्य व सुंदर मंदिर उभारण्यात आले. तसेच दीडशे वर्षानंतर प्रथमच जेजुरीत जानाई देवीची यात्रा नुकतीच संपन्न झाली.

जेजुरी ग्रामदेवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्ट, पुजारी आगलावे परिवार व जेजुरी शहरातील महिलांच्या वतीने देवीच्या मंदिरात चैत्रगौर हरिद्रा कुंकुम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. देवीच्या उत्सव मूर्तीला झुल्यामध्ये बसवून धार्मिक विधी करण्यात आले. यावेळी या सोहळ्यासाठी शहरातील महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. पूजा अभिषेक, हरिद्रा कुंकुम मार्जन, भजन आदी धार्मिक विधी मंदिरात संपन्न झाले. धार्मिक विधींचे परोहित्य आगलावे पतीवराच्या वतीने करण्यात आले.







# अक्षयतृतीयेला खंडेरायाला चंदनउटी लेपन

**मंचर (दै. संध्या)**

आंबेगाव तालुक्यातील धामणी येथे अक्षयतृतीयेच्या निमित्ताने कुलस्वामी श्री म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात पारंपरिक व भक्तिमय वातावरणात चंदनउटी लेपन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. रविवारी (दि. १९ एप्रिल २०२६) पहाटेपासूनच शेकडो भाविकांनी “सदानंदाचा येळकोट, जय मल्हार”च्या घोषात मंदिर परिसर दुमदुमून टाकत खंडेरायाचे दर्शन घेतले.

अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर स्वयंभू सप्तशिवलिंगावर तसेच खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मूर्तींवर वसंत ऋतूतील तिसरी वासंतिक चंदनउटी साकारण्यात आली. या चंदनउटीचे मनमोहक स्वरूप पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

पहाटे चार वाजता मंदिरात घंटानाद होऊन धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. त्यानंतर विविध भागांतून आलेल्या बारा जोडप्यांच्या हस्ते वसंतपूजा, दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक विधी संपन्न झाले. यामध्ये आदिनाथ जाधव व मंगल जाधव (धनकवडी), तुषार जाधव व श्रद्धा जाधव (मुंबई), शिवाजी सरडे व सुनिता सरडे (हडपसर), सोमनाथ सोनवणे व स्वाती सोनवणे (वाफगाव), भूपेंद्र तांबे व कृष्णल तांबे (शिरदाळे), राहुल भगत व गायत्री भगत, दिलीप पंचरास व आशा पंचरास, नारायण गणपत जाधव व पुष्पा जाधव, सुनील सासवडे व संगिता सासवडे, मच्छिंद्र रोकडे व मीना रोकडे, बबन जाधव व अलका जाधव तसेच नवनाथ बढेकर व शोभा बढेकर (धामणी) या जोडप्यांचा समावेश होता.

त्यानंतर देवस्थानचे सेवेकरी प्रभाकर भगत, दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, नामदेव भगत, पांडुरंग भगत, राजेश भगत, अनिरुद्ध वाळूंज व बाळशिराम साळगट यांनी स्वयंभू सप्तशिवलिंग आणि पंचधातूच्या खंडोबा, म्हाळसाई व बाणाईच्या मुखवट्यांवर केशर व दवण्याच्या अत्तरमिश्रित सुगंधी चंदनउटीचा लेप केला.

यावेळी खंडेरायाला पुरणपोळी, भजी व कुरडईचा नैवेद्य दाखवून शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. चंदनउटी लेपन सुरू असताना मंदिराच्या सभामंडपात भक्तिमय अभंगांनी वातावरण भारावले होते, तर बाहेरील परिसरात पारंपरिक सनईच्या मंगल स्वरांनी भक्तीमय वातावरण अधिक खुलले.



अभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले. मंदिरात झेंडू, गुलाब व अष्टरीच्या फुलांची आकर्षक सजावट नारायण जाधव व पुष्पा जाधव यांनी केली, तर विद्युत रोषणाईची व्यवस्था प्रथमेश विधाटे व योगेश विधाटे यांनी केली होती. मंदिर परिसरात महिला भाविकांनी काढलेल्या रांगोळ्यांनी परिसर अधिक देखणा झाला होता.

चंदनउटी लेपनानंतर उपस्थित भाविकांच्या कपाळावर चंदन व भंडारा लावण्यात आला. त्यानंतर दर्शनासाठी मंदिर खुले करण्यात आले. वासंतिक चंदनउटीमुळे उष्णतेचा दाह कमी होतो आणि हरिनामाच्या भजनामुळे आत्मिक शांती लाभते, अशी भावना यावेळी भाविकांनी व्यक्त केली.

चैत्र पौर्णिमेनिमित्त पुणे, नगर, नाशिक, मुंबई, भोसरी व पिंपरी-चिंचवड परिसरातून मोठ्या संख्येने भाविक सहकुटुंब येथे दाखल झाले होते. मंदिर परिसरात जागरण मंडपात वाघे-वीरांच्या पारंपरिक जागरणाचे कार्यक्रम रंगले होते. तसेच परिसरात प्रसाद, फुले व तळीभंडार विक्रीची दुकानेही उभारण्यात आली होती.

दरम्यान, धामणी ग्रामस्थांनी ६६ वर्षांनंतर (२०२४ पासून) पारंपरिक पद्धतीने चंदनउटी लेपन सोहळा पुन्हा सुरू केला असून गुढीपाडवा, चैत्र पौर्णिमा आणि अक्षयतृतीया या तीन सणांनिमित्त हा सोहळा दरवर्षी साजरा केला जात असल्याची माहिती देवस्थानचे सेवेकरी दादाभाऊ भगत यांनी दिली.